रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १०
www.ramprahar.com

शनिवार, २७ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## पंढरपूरच्या विठूरायाला विक्रमी दान; 'एसटी'लाही उत्पन्न



**मुंबई :** यंदा आषाढी यात्रेनिमित्त लाखो वारकरी लाडक्या विठूरायाच्या दर्शनासाठी एसटीने पंढरपुरात दाखल झाले होते. वारकऱ्यांच्या सेवेसाठी एसटी महामंडळातर्फे १५ ते २१ जुलैदरम्यान सुमारे पाच हजार विशेष बसेस सोडण्यात आल्या होत्या. या पाच हजार बसेसद्वारे १९ हजार १८६ फेऱ्यांमधून नऊ लाख ५३ हजार भाविक-प्रवाशांनी सुरक्षित प्रवास केला असून, यातून २८ कोटी ९२ लाखांचे रुपये उत्पन्न एसटीला मिळाले आहे. तर यंदाच्या विक्रमी आषाढी यात्रेत विठूरायाची तिजोरी भरली असून मंदिराच्या खजिन्यात तब्बल आठ कोटी ३४ लाख रुपये जमा झाले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा दोन कोटी रुपये जास्त जमा झाल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. यावर्षी आषाढीला १८ ते २० लाख भाविक आल्याने पंढरपूर ओव्हरपॅक झाले होते.

### अंतरंग

अलिबागजवळ बार्जमध्ये अडकलेल्या १४ जणांची सुटका/५

कोकणाच्या विकासासाठी कटिबद्ध -मुख्यमंत्री शिंदे/७

भारताची आशिया चषकाच्या अंतिम फेरीत धडक/८

# पाकचे मनसुबे पूर्ण होऊ देणार नाही!

## पंतप्रधान मोदींचा इशारा; कारगिल विजय दिनानिमित्त लष्कराप्रति कृतज्ञता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कारगिल विजय दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि. २६) देशवासियांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी पाकिस्तानचे मनसुबे कधीच पूर्ण होऊ देणार नाही, अशी ग्वाही देताना त्यांनी पाकिस्तानातील दहशतवाद्यांनाही इशारा दिला आहे. ते कारगिल येथूनच बोलत होते.

ते म्हणाले की, कारगिल विजय दिवस आम्हाला सांगतो की, राष्ट्रासाठी दिलेले बलिदान अमर होतात. दिवस, महिने, वर्षे, शतके जातात, परिस्थिती बदलते पण राष्ट्राच्या सुरक्षेसाठी आपल्या जीवाची बाजी लावणाऱ्यांची नावे कायम अमर राहतात. हा देश आमच्या लष्कराच्या पराक्रमी महानायकांचा सदा सर्वदा ऋणी आहे. हा देश त्यांच्याप्रती कृतज्ञ आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

कारगिलमध्ये आम्ही, फक्त युद्ध जिंकले नव्हते तर आम्ही सत्य, संयम आणि सामर्थ्याचा अद्भूत परिचय दिला होता, असेही ते म्हणाले.



### अग्निपथ योजनेवरील आरोपांना सडेतोड उत्तर

कारगिल विजय दिवसाच्या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी अग्निपथ योजनेवरून देशात सध्या सुरू असलेल्या गदारोळाचा समाचार घेतला. देशाचे सैन्यदल तरुण असावे यासाठी यापूर्वी संसदेकडून प्रयत्न झाले. त्यासाठी समितीदेखील गठीत करण्यात आली, पण पुढे काहीच झाले नाही. या सरकारने हा मुद्दा हाती घेतला. अग्निपथ योजनेतून देशाचे हे महत्वाचे स्वप्न साकारण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

## इर्शाळवाडी दरडग्रस्तांना महिनाभरात घरांचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



इर्शाळवाडी दुर्घटनेला गेल्या आठवड्यात एक वर्ष पूर्ण झाले. दुर्घटनेच्या कटु आठवणी जगत इर्शाळवाडीचे नागरिक आपले जीवन जगत आहेत. आता ती इर्शाळवाडी शासनाच्या पाठपुराव्यानुसार लवकरच उभी राहत आहे. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे आदींनी लक्ष घातले आहे. दरडग्रस्तांच्या घराचे स्वप्न हे अंतिम टप्प्यात आले आहे.

मेसर्स बी. जी. शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लिमिटेड पुणे यांनी या ४४ घरांचे आकर्षक बांधकाम व योग्य नियोजन करून करण्यात आले आहे. सिडकोद्वारे ४४ घराचे बांधकाम हे पुर्णत्वाला आले असून येत्या महिनाभरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते घरांचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती शिर्के कंपनीकडून देण्यात आली आहे. (पान २ वर..)



## कळंबोलीतील अमर रुग्णालयावर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या आदेशाची अवहेलना केल्याप्रकरणी कळंबोलीमधील डॉ. अर्जुन पोळ यांच्या अमर रुग्णालयावर आयुक्त मंगेश चितळे यांच्या मान्यतेने वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत कडक कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईमध्ये अमर रुग्णालयाचा परवाना रद्द करण्यात आला आहे. तसेच रुग्णालयाच्या सोनोग्राफी केंद्राची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. याबरोबरच डॉ. अर्जुन पोळ यांच्याविरोधात कळंबोली पोलीस स्थानकामध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

मावळ तालुक्यात झालेल्या तिहेरी हत्याकांडप्रकरणी गर्भवती महिला समरिन निसार नेवरेकर (वय २५, रा. वराळे, तालुका मावळ) हिचा गर्भपात करण्याची तक्रार पनवेल महापालिका हद्दीतील कळंबोली येथील अमर हॉस्पिटलबद्दल पालिकेकडे आली होती. वृत्तपत्रातील बातमीनुसार महापालिकेने या रुग्णालयामध्ये चौकशी केली असता रुग्णालयात महिलेचा मृत्यू झाला, पण ती महिला गर्भवती असल्याचे पुरावे मिळाले नव्हते. (पान २ वर..)

## अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

पुणे येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे सिंहगड रोड, संचेती पुलाजवळील पाटील इस्टेट, एकता नगर, फुलपची वाडी आदी भागातील घरांमध्ये पाणी शिरल्याने चिखल आणि घाणीचे साम्राज्य पसरले. या घरांमधील चिखल, गाळ आणि कचऱ्याची महानगर पालिका तसेच साफसफाई करणाऱ्या खासगी कंपन्याच्या मदतीने युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम राबवावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि.२६) जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. पुरामुळे घरांचे, शेतीचे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केल्या आहेत.

पुण्यातील सिंहगड रोड, संचेती पुलाजवळील पाटील इस्टेट, एकता नगर, फुलपची वाडी आदी भागातील घरामध्ये चिखल शिरला आहे. त्यामुळे या भागातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून त्याची त्वरित दखल मुख्यमंत्री शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला डीप क्लीन मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. (पान २ वर..)

## शासनाच्या योजना सामान्यांपर्यंत पोहचवा

### पेणमध्ये मंत्री चव्हाणांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**पेण : प्रतिनिधी**

भाजप जनमाणसांच्या विकासासाठी कार्य करीत आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व सामान्य नागरिकांसाठी शासनाच्या माध्यमातून महत्त्वाच्या योजना आणल्या आहेत. त्या योजना आणि त्यांचे विचार गावागावात जाऊन पोहचवण्याचे काम कार्यकर्त्यांनी करायचे आहे, असे आवाहन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी पेण येथे झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीवेळी उपस्थित पदाधिकारी कार्यकर्त्यांना केले.



भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक पेण येथे मंत्री चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजप कार्यालयात झाली. या वेळी कोकण पदवीधर मतदार संघातून निवडून आलेले आमदार निरंजन डावखरे यांचा सत्कार करण्यात आला. (पान २ वर..)

## तीन दिवसांनंतर पावसाची उसंत

**अलिबाग : प्रतिनिधी**



सलग तीन दिवस झोडपून काढल्यानंतर पावसाने शुक्रवारी (दि. २६) विश्रांती घेतल्यामुळे रायगडकारांनी सुटकेचा निःश्वास टाकला. पाऊस थांबल्यामुळे रायगडकरांना दिलासा मिळाला. शुक्रवारीदेखील रायगड जिल्ह्यात पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला होता, परंतु पाऊस पडला नाही.

तीन दिवस मुसळधार पावसाने संपूर्ण रायगड जिल्ह्याला झोडपून काढले होते. रोहा, नागाठणे, महाड या शहरांध्यमे पूर आला होता. काही रस्ते पाण्याखाली गेले होते. माणगाव-पुणे मार्गावर ताम्हिणी घाटात दरड कोसळली होती. त्यामुळे हा मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. शुक्रवारी पावसाने विश्रांत घेतली. हवामान खात्याने शुक्रवारीही रायगड जिल्ह्यात पावसाचा रेड अलर्ट दिला होता. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली होती.

### तालुकानिहाय पाऊस

**अलिबाग** ७१.०० मिमी, **पेण** ८३.००, **मुरूड** १९.००, **पनवेल** ११७.६०, **उरण** ८६.००, **कर्जत** २६८.२०, **खालापूर** १२४ .००, **माणगाव** ४८.००, **रोहा** ७१.००, **सुधागड** १६४.००, **तळा** ६२.००, **महाड** १०२.००, **पोलादपूर** १२५.००, **म्हसळा** ८०.००, **श्रीवर्धन** ०८.००, **माथेरान** २०१.०० **सरासरी १०१.८६**

## गणेशोत्सवानिमित्त राज्यात मिळणार आनंदाचा शिधा

**मुंबई : प्रतिनिधी**




यंदाच्या गौरी गणपती उत्सवानिमित्त राज्यातील एक कोटी ७० लाख ८२ हजार ८६ शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा वितरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

प्रती संच १०० रुपये या सवलतीच्या दराने मिळणाऱ्या या आनंदाचा शिधा संचामध्ये प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर सोयाबीन तेल या शिधा जिन्नसांचा समावेश असणार आहे. आनंदाचा शिधा संच्याचे वाटप १५ ऑगस्ट २०२४ ते १५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत करण्यात येणार आहे.

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिका धारक (पान २ वर..)









# माजी सैनिकांच्या कल्याणासाठी शासन कटिबद्ध

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शहिदांना आदरांजली

**मुंबई : प्रतिनिधी**

कारगिल युद्धातील वीरांना अभिवादन करताना आपण त्यांचे शौर्य कायम आठवणीत ठेऊन कोणत्या ना कोणत्या स्वरूपात देशाची सेवा केली पाहिजे, असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या युद्धात शहीद झालेल्या महाराष्ट्रातल्या सहा जवानांचेदेखील स्मरण केले. २५व्या कारगिल विजय दिवसानिमित्त शुक्रवारी (दि.२६) त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. माजी सैनिक आणि त्यांच्या परिवारासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.



मुख्यमंत्री यांनी कारगिल युद्धातील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सैनिक कधीही माजी होत नसतो. याची जाणीव आम्हाला आहे. म्हणूनच त्याच्या कल्याणासाठी आम्ही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. शासनाने माजी सैनिकांसाठी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतलाय. खारघर येथे माजी सैनिकांचे विश्रामगृहही उभे करणार आहोत. मेस्कोचे विविध उपक्रम, माजी सैनिकांना रोजगार संधी, त्यांच्या वेतनातील तफावत दूर करणार आहोत. मुंबईमध्ये युद्ध संग्रहालय करण्याचा निर्णय घेतलाय.

सातारा जिल्ह्यातल्या अपशिंगे मिलिटरी गावातील विकास कामांना प्राधान्य देण्याचा शासनाचा मानस आहे. माजी सैनिकांना टोलमधून सवलत आणि असे अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

आजही कुठलीही आपत्ती आली की आपल्याला सैन्य दलातील आपल्या जाँबाज जवानांची आठवण येते असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, सीमेचे रक्षण असो की आपल्या परिसरातील गंभीर आपत्ती आपल्या अंतर्गत बचाव पथकांसोबत या जवानांची लष्कर, हवाई आणि नौदलाची साथ मिळाली की आपल्याला आणखी धीर येतो. इतका विश्वास सैन्य दलातील जवानांवर, त्यांच्या हिमतीवर ठेवतो.

वीर जवानांच्या कुटुंबांची काळजी घेण्यासाठी येत्या काळात आणखी काही महत्वाचे निर्णयही आपण घेणार आहोत असेही ते म्हणाले. आपला महाराष्ट्र शिवछत्रपतींचा महाराष्ट्र आहे. शिवछत्रपतींना देशाला स्वाभिमान आणि धर्म-देव-देवळांच्या रक्षणाचा धडा दिला. हाच वारसा घेऊन आमचे शासन काम करीत आहे. देशाच्या सीमेचे रक्षण करणारे जवान आणि त्यांच्या कल्याणासाठी जे-जे काही करता येईल त्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत हे आमचे कर्तव्य आहे, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# काँग्रेस नेते सुनील केदार यांना धक्का

## सर्वोच्च न्यायालयाकडून हस्तक्षेप करण्यास नकार

**नागपूर : प्रतिनिधी**

विदर्भातील काँग्रेस नेते आणि सावरनेरचे अपात्र आमदार सुनील केदार यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधील १५० कोटींपेक्षा जास्त रकमेच्या सरकारी रोखे खरेदी घोटाळ्यातील दोषसिद्धीला अंतरिम स्थगिती मिळवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

या याचिकेवर शुक्रवारी (दि.२६) न्यायमूर्ति सूर्यकांत व के. व्ही. विश्वनाथन यांच्यासमक्ष सुनावणी झाली, मात्र न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने सुनील केदार यांना सध्या तरी दिलासा मिळालेला नाही.



जिल्हा न्यायालयाने केदार यांच्या याचिकेवर सप्टेंबर अखेरपर्यंत आपला निकाल द्यावा, अशा सूचना सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आल्या आहेत.

नागपुरातील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने २२ डिसेंबर २०२३ रोजी केदार यांना भादंविच्या कलम ४०९ (शासकीय नोकर, आदींद्वारे विश्वासघात), ४०६ (विश्वासघात), ४६८ (बनावट दस्तऐवज तयार करणे), ४७१ (बनावट दस्तऐवज खरे भासविणे) व १२०-ब (कट रचणे) या गुन्ह्यांतर्गत दोषी ठरवून कमाल पाच वर्षे सश्रम कारावास व एकूण १२ लाख ५० हजार रुपये दंड, अशी शिक्षा सुनावली आहे.

या प्रकरणात अटक झाल्यानंतर जामीन मिळाल्याने सध्या केदार हे तुरुंगाबाहेर आहेत, मात्र कारावासाची शिक्षा दोन वर्षे व त्यापेक्षा जास्त असल्यामुळे त्यांना लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम ८(३) अनुसार आमदार म्हणून सहा वर्षांकरिता अपात्र ठरविण्यात आले आहे.

# सिडकोकडून नवी मुंबईसह नैना क्षेत्रातील अतिक्रमणावर कारवाई

**नवी मुंबई : सिडको वृत्तसंस्था**

सिडकोतर्फे २०२१ ते २०२४ दरम्यान नवी मुंबई आणि नैना क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, होर्डिंग्ज इ. विरूद्ध धडक कारवाई करण्यात आली. या कारवायांदरम्यान पाच हजारांहून अधिक अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली, तसेच अनधिकृतरित्या डेब्रिज टाकणे, माती चोरी, अवैध वाहतूक प्रकरणी ४८ गुन्हे दाखल करण्यात आले असून १२४ वाहनांवर जप्तीची कारवाई करण्यात आली. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी, सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली सदर मोहीम पार पडत आहे.

कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून जानेवारी २०२० ते जून २०२४ या कालावधीमध्ये अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात एकूण ९६८ निष्कासन मोहिमा राबविण्यात आल्या. निष्कासन कारवाई करण्यापूर्वी अनधिकृत बांधकाधारकांना नोटीसा बजावून बांधकाम निष्कासित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

या कारवायांदरम्यान एकूण २५८ आरसीसी बांधकामे, ६४० वीट बांधकामे, ४,५८७ तात्पुरत्या स्वरूपाची अतिक्रमणे, २४४ होर्डिंग्ज व १५ क्रशर यांविरूद्ध कारवाई करण्यात आली आहे. सिडकोच्या भूखंडांवर अवैधरीत्या डेब्रिज टाकण्याप्रकरणी एकूण ४५, माती चोरी, अवैध वाहतूक प्रकरणी तीन गुन्हे दाखल करण्यात येऊन एकूण १२४ वाहने जप्त करण्यात आली आहेत.

**नवी मुंबई एक सुनियोजित शहर असून या शहराची अनिर्बंध वाढ रोखणे हे सिडकोचे प्रमुख कर्तव्य आहे. या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सिडकोने नेहमीच कठोर पाऊले उचलली आहेत. त्याअंतर्गतच सध्या सिडकोतर्फे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई सुरू आहे.**

**-विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक**

# भिसेगाव परिसरात तरुणाची आत्महत्या

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील भिसेगाव येथील वेताळ मंदिरासमोरील वडाच्या झाडाला गळफास लावून एका तरुणाने आत्महत्या केली. त्या तरुणाच्या गळ्याचा फास पाहिला असता आत्महत्या की घातपात याची चर्चा कर्जतमध्ये सुरू आहे.

भिसेगावमधील कर्जत-खोपोली रस्त्यावर असलेल्या वेताळ देवस्थानचे समोर वडाचे झाड आहे. त्या वडाच्या झाडाला एका तरुणाने गळफास घेतला असल्याची माहिती येथील पोलीस पाटील यांनी कर्जत पोलिसांना कळविले. दोराचे साहाय्याने तयार केलेला फास पाहिला असता या तरुणाची हत्या झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. या तरुणाचे नाव अमित हेमंत तिवारी असून तो नाशिक येथील रहिवासी असल्याचे उघड झाले आहे. हा तरुण नाशिक येथून कर्जत येथे का आला? याचा तपास करण्यासाठी कर्जत पोलिसांनी एक टीम तैनात केली आहे.

# ठाण्यात ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

**ठाणे : प्रतिनिधी**


उद्धव ठाकरे गटाच्या युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी (दि.२६) राजिनामे दिले. अंतर्गत गटबाजीला कंटाळून सामूहिक राजीनामे देत असल्याचे पत्रात म्हटले आहे. या राजिनाम्यांमुळे ठाण्यात ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीबंड केल्यानंतर माजी खासदार राजन विचारे हे अद्यापही उद्धव ठाकरे यांच्यासोबत आहेत. राजन विचारे यांच्यासह युवासेनेचे काही पदाधिकाऱ्यांनीही उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला होता. शुक्रवारी ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख अर्जुन डाभी, शहर अधिकारी किरण जाधव, बाळकुम येथील शाखाप्रमुख अभिषेक शिंदे, उपसमन्वयक दिपक कनोजिया आणि खोपटचे विभाग अधिकारी राज वर्मा यांनी राजिनामा दिला आहे. त्यासंदर्भाचे पत्र त्यांनी युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांना पाठिवले आहे.

गेली १५ वर्षे सातत्याने युवासेना स्थापनेपासून युवकांचे संघटन ठाणे शहरात मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे आणि एकनिष्ठेने आम्ही दिवस-रात्र काम करीत होते. प्रसंगी विरोधकांना अंगावरही घेतले, परंतु दोन वर्षांत काही निवडक पदाधिकाऱ्यांनी सुरू केलेल्या अंतर्गत गटबाजीमुळे आमच्या निष्ठेवर प्रश्न उपस्थित केले गेले. त्यामुळे आम्ही राजीनामा देत आहोत, असे पत्रात म्हटले आहे. या राजीनाम्यांमुळे ठाण्यात ठाकरे गटाला धक्का मानला जात आहे.

# गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाण्यासाठी सहा विशेष गाड्या

**मुंबई :** यंदा ७ सप्टेंबर रोजी गणेशोत्सव असून दोन महिने आधीच कोकणात जाण्यासाठी गणेशभक्तांची लगबग सुरू होते. कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी पश्चिम आणि कोकण रेल्वे मार्गावर आणखी सहा विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



मध्य आणि कोकण रेल्वेवरील विशेष रेल्वेगाड्यांची घोषणा करून, त्यांचे तिकीट आरक्षण सुरू झाल्यानंतर काही मिनिटात प्रतीक्षा यादीची क्षमता पूर्ण झाली, तर आता पश्चिम आणि कोकण रेल्वेवरून विशेष रेल्वेगाड्या सोडण्यात येत आहेत. गणपती विशेष रेल्वेगाड्यांपैकी गाडी क्रमांक ०९००२, ०९०१०, ०९०१६, ०९४११, ०९१४९ या पाच विशेष गाड्यांचे आरक्षण रविवारी (दि.२८) सुरू होणार आहे.

गाडी क्रमांक ०९००१ मुंबई सेंट्रल-ठोकूर (साप्ताहिक) विशेष तिकीट दरासह मुंबई सेंट्रल येथून दर मंगळवारी ३, १० आणि १७ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता सुटेल. गाडी क्रमांक ०९००२ ठोकूर-मुंबई सेंट्रल (साप्ताहिक) विशेष तिकीट दरासह ठोकूर येथून दर बुधवारी ४ सप्टेंबर, ११ सप्टेंबर, १८ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजता सुटेल. गाडी क्रमांक ०९००९ मुंबई सेंट्रल-सावंतवाडी रोड (आठवड्यातील ६ दिवस) विशेष तिकीटदरासह मुंबई सेंट्रल येथून सोमवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार आणि रविवार या दिवशी धावेल. २ ते १६ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजता सुटेल. गाडी क्रमांक ०९०१० सावंतवाडी रोड-मुंबई सेंट्रल (आठवड्यातील ६ दिवस) विशेष तिकीटदरासह सावंतवाडी रोडवरून मंगळवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार, रविवार आणि सोमवार या दिवशी धावेल. ३ ते १७ सप्टेंबर रोजी पहाटे ४.५० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी मुंबई सेंट्रलला रात्री ८.१० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०९४१२ अहमदाबाद-कुडाळ (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह अहमदाबाद येथून ३, १० आणि १७ सप्टेंबर रोजी म्हणजे दर मंगळवारी सकाळी ०९:३० वाजता सुटेल, तर दुसऱ्या दिवशी कुडाळला पहाटे ३.३० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०९४११ कुडाळ-अहमदाबाद (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह कुडाळ येथून ४, ११ आणि १८ सप्टेंबर रोजी म्हणजे बुधवारी पहाटे ४.३० वाजता पोहचेल.

गाडी क्रमांक ०९१५० विश्वामित्री-कुडाळ (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह विश्वामित्री येथून २, ९ आणि १६ सप्टेंबर रोजी दर सोमवारी सकाळी १० वाजता सुटेल. गाडी क्रमांक ०९१४९ कुडाळ-विश्वामित्री (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह कुडाळ येथून ३, १० आणि १७ सप्टेंबर रोजी पहाटे ४.३० वाजता सुटेल.

गाडी क्रमांक ०९४२४ अहमदाबाद-मंगळुरू (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह अहमदाबाद येथून ६, १३, २० सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता सुटेल. गाडी क्रमांक ०९४२३ मंगळुरु-अहमदाबाद (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह मंगळुरु येथून ७, १४ आणि २१ सप्टेंबर सुटेल.

# मिरवणुकीने स्वागत होणारा गुन्हेगार पुन्हा कारागृहात

**नाशिक** : कारागृहातून बाहेर पडलेल्या सराईत गुन्हेगाराची साथीदारांनी मिरवणूक काढणे त्यांच्या अंगलट आले असून मिरवणुकीत सहभागी झालेल्यांविरूद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल करून बाहेर आलेल्या हर्षद पाटणकरची रवानगी पुन्हा कारागृहात केली आहे.

हर्षद पाटणकरवर शहर पोलिसांनी एमपीडीए अंतर्गत कारवाई केली होती. वर्षभर तो कारागृहात होता. कारागृहातून तो बाहेर आल्यानंतर साथीदारांनी त्याची मिरवणूक काढली. याबाबत समाजमाध्यमांमधून पडसाद उमटल्यावर पोलिसांनी तातडीने हर्षदसह त्याचे नातेवाईक, साथीदार अशा ३० जणांवर गुन्हा दाखल केला. आतापर्यंत १९ जणांना ताब्यात घेण्यात आले. हर्षदला अन्य गुन्ह्यामध्ये अटक करून त्याची रवानगी पुन्हा कारागृहात करण्यात आली.

# कांदिवलीत सोनेरी कोल्ह्याचे दर्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

कांदिवलीतील चारकोप परिसरात सोनेरी कोल्ह्याचे (गोल्डन जॅकेल) दर्शन झाले. दरम्यान, बचाव पथक आणि वन अधिकाऱ्यांनी या कोल्ह्याला नैसर्गिक अधिवासात सोडले.

कांदिवलीत चारकोप परिसरातील एका इमारतीत मंगळवारी सायंकाळी एक सोनेरी कोल्हा आढळला. प्रथमदर्शी रहिवाशांना तो कुत्रा असावा असे वाटले, मात्र काही वन्यप्रेमींनी तो कुत्रा नसून सोनेरी कोल्हा असल्याची खात्री केली.

कोल्ह्याची सुटका करण्यासाठी तत्काळ बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत त्यांनी कोल्ह्याच्या सुटकेसाठी प्रयत्न केले. कोल्ह्याला पिंजऱ्यात जेरबंद करून तात्काळ नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.



## पान १ वरून

### इर्शाळवाडी दरडग्रस्तांना महिनाभरात घरांचे वाटप

दरडग्रस्तांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चौक येथील तात्पुरत्या कंटेनर वसाहतींना दोन वेळा भेट देत पुनर्रचनासाठी तातडीचे प्रयत्न सुरू केले. इर्शाळगडाच्या पायथ्याशीच नव्याने इर्शाळवाडी उभी राहत असून त्यांच्या घराचे स्वप्न हे अंतिम टप्यात आले आहे. सिडकोद्वारे ४४ घरांचे बांधकाम हे पुर्णत्वाला आले असून मुख्यमंत्र्यांच्या हस्ते घरांचे वाटप करण्यात येणार आहे. बांधकाम क्षेत्रातील नामवंत कंपनी मेसर्स बी. जी. शिर्के कंन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा. लिमिटेड पुणे यांनी ४४ घरांचे बांधकाम केले. शिवाय याजागी समाज मंदिर, अंगणवाडी, खेळाचे मैदान, अंतर्गत रस्ते आणि पाण्याचे योग्य नियोजन आदी सुविधाही देण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना इर्शाळवाडी दुर्घटनेकडे जातीने लक्ष दिले. शिंदे सरकारने इर्शाळवाडी कुटुंबाची तात्पुरते स्थलांतर कंटेनर वसाहतीत करण्यात आल्यानंतर प्रशासनाने वर्षभर पूर्णपणे कुटुंब प्रमाणे त्यांची काळजी घेतली आहे. या ठिकाणी २४ तास पाणी, वीज आरोग्यसेवा, मोफत रेशन, मोफत गॅस सिलेंडर यासारख्या सोयी सुविधा पुरवल्या आहेत. शिवाय खासदार श्रीकांत शिंदे यांच्या फाउंडेशनने १८ मुलांना दत्तक घेतले आहे.

### अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा -मुख्यमंत्री

घरांमध्ये शिरलेल्या पुराच्या पाण्यामुळे झालेला चिखल साफ करण्यासाठी सुमित इंटरप्राईजेस आणि बीव्हीजी या खासगी स्वच्छता कंपन्यांची मदत घेण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाची दखल घेऊन सुमित कंपनी ५०० स्वच्छता कर्मचारी आणि बीव्हीजी कंपनी १०० सफाई कर्मचारी उपलब्ध करून देणार असून त्यांच्या माध्यमातून घरांमधील चिखल काढून साफसफाई करण्यात यावी, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

पुराचे पाणी, चिखल यामुळे परिसरात रोगराई पसरू नये यासाठी महानगरपालिका प्रशासनाने औषधांची फवारणी करावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत.

### शासनाच्या योजना सामान्यांपर्यंत पोहचवा

या वेळी भाजप दक्षिण जिल्हा रायगड उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी मंत्री चव्हाण यांचा सन्मान केला. बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार रविशेठ पाटील, आमदार निरंजन डावखरे, महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विक्रांत पाटील, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, रायगड लोकसभा निवडणूक प्रमुख सतीश धारप, माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, प्रशांत शिंदे, बिपीन म्हामुणकर, गीता पालरेचा, महेश मोहिते, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, राजेश मापारा, सोपान जांभेकर, डी.बी.पाटील, मंगेश दळवी, संजय डंगर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विक्रांत पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन मिलिंद पाटील व संजय डंगर यांनी केले.

### कळंबोलीतील अमर रुग्णालयावर कारवाई

दरम्यान, अमर हॉस्पिटल, कळंबोली या रुग्णालयात १८ फेब्रुवारी २०२४ रोजी साबरीन अजमल खान (वय २५) या गरोदर महिलेचा प्रसुती पश्चात मृत्यू झाला. त्या अनुषंगाने पनवेल महापालिका स्तरावरील गठित करण्यात आलेल्या माता मृत्यू अन्वेषण समितीच्या बैठकीमध्ये अमर हॉस्पिटलच्या निष्काळजीपणामुळे या महिलेचा प्रसुती पश्चात मृत्यू झाल्याचा अहवाल प्राप्त झाला होता. या प्रकरणी अमर रुग्णालय व्यवस्थापनाकडुन बऱ्याचशा कायदेशीर बाबींची, नियम व मानकांची पुर्तता होत नसल्याने या रुग्णालयाने पुढे अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत आंतररुग्ण विभागात नवीन रुग्ण दाखल करुन घेण्यास महापालिकेच्या वतीने लिखित स्वरूपात प्रतिबंध करण्यात आला होता.

मुंबई नर्सिंग होम कायद्यानूसार या रुग्णालयाची नोंदणी रद्द करण्याबाबतची प्रक्रिया सुरू करण्यात आली. याबाबत चौकशी करण्यासाठी आयुक्त यांच्यासमोर १० जुलै २०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. तरीसुद्धा या रुग्णालयाने रुग्ण भरती केली होती.

याचवेळी रुग्णालयास कुठल्याही स्वरुपाचे आंतररुग्ण विभागात रुग्ण भरती करून उपचार करण्यासाठी मज्जाव असतानासुध्दा अश्या स्वरुपाचा अवैध पद्धतीने गर्भपात करणेसारखा गंभीर गुन्हा हॉस्पिटल व्यवस्थापनाकडुन झालेला आहे, अशी वृत्तपत्रातील बातमी निदर्शनास आली. या प्रकरणातील सर्व तथ्ये व सत्याची पडताळणी केल्यानंतर व पुर्वीच्या अनेक तक्रारी लक्षात घेऊन, प्रशासनाच्या आदेशाची अवहेलना केल्यामुळे महापालिकेने अमर रुग्णालयावर तातडीने कडक कारवाई केली आहे.

यामध्ये रुग्णालयाचा परवाना रद्द करण्यात आला आहे. याबरोबरच रुग्णालयाच्या सोनोग्राफी केंद्राची नोंदणीदेखील रद्द करण्यात आली आहे तसेच कळंबोलीमधील अमर रुग्णालयाच्या डॉ. अर्जुन पोळ यांच्याविरोधात कळंबोली पोलीस स्थानकामध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी पालिकेच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत तसेच अमर रूग्णालयाचे संचालक डॉ. अर्जुन पोळ यांचा व्यवसाय परवाना रद्द करण्याबाबत महाराष्ट्र वैद्यकिय परिषद (महाराष्ट मेडिकल कौन्सील) यांच्याकडे लेखी पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे.

### गणेशोत्सवानिमित्त राज्यात मिळणार आनंदाचा शिधा

यासोबतच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे, नागपूर विभागातील वर्धा या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील (एपीएल) केशरी शिधापत्रिका धारक शेतकरी यांना या आनंदाचा शिधा मिळणार आहे.

प्रती शिधापत्रिका एक शिधा जिन्नस संचाची खरेदी करण्यासाठी ५६२.५१ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या संचाचे वाटप ई-पॉस प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे.

# कर्जतमध्ये प्रती पंढरपूर येथील बंधाऱ्यामुळे पूरजन्य परिस्थिती आटोक्यात



**कर्जत** : शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदीच्या तीरावर प्रती पंढरपूर आळंदी हे तीर्थक्षेत्र विकसित केले आहे. या भागात उल्हासनदी पात्रात उन्हाळ्यातदेखील पाणी राहावे यासाठी कोल्हापूर टाईपचा बंधारा बांधला. नदी खोलीकरण केल्याने कर्जत शहरात कुठेही पुराचा त्रास झाला नाही, तसेच या बंधाऱ्यामुळे कोणताही धोका नसल्याच्या प्रतिक्रिया शिवसेना पक्षाकडून तसेच नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत.

गेल्या दोन दिवसांपासून पावसाने थैमान घातले होते. कर्जत तालुक्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली. आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून चालत असलेल्या नदी स्वच्छता अभियानामुळे नदीमधील गाळ काढण्यात आल्याने शहरात पुराचा फटका बसला नाही. उन्हाळ्यात कोरड्या असलेल्या उल्हास नदीमध्ये पाणी असावे असा प्रयत्न उल्हास नदीत कोल्हापूर टाईप बंधारा बांधून केला जात आहे. यामुळेही पुराचा धोका निर्माण झाला नाही.

## निवडक

### जयकुमार डिगोळे यांना डॉक्टरेट पदवी



**पनवेल** : कामोठे येथील जयकुमार डिगोळे यांना सामाजिक कार्याबद्दल शिकागो युनिव्हर्सिटी ऑफ अमेरिका यांच्याकडून मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. दिल्ली येथील इंडिया इंटरनॅशनल सेंटर येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. जयकुमार डिगोळे वयाच्या १७व्या वर्षापासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. कामोठे येथे त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, कलेच्या क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. डॉक्टरेट पदवी मिळाल्यामुळे कामाची पोचपवती मिळाली आहे. सामाजिक क्षेत्रात काम करण्याची ऊर्जा मिळाली आहे. भविष्यात सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणार असल्याचे जयकुमार डिगोळे यांनी सांगितले आहे.

### किरण मुंबईकर एलएलबी उत्तीर्ण



**पनवेल** : तालुक्यातील किरण मुंबईकर यांनी एलएलबी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. त्यांचे सगळीकडे त्यामुळे कौतुक होत आहे. मूळचे मुरूड-जंजिरा येथील मुंबईकर हे पनवेल करंजाडे येथे वास्तव्यास आहेत. ते भाजपचे पनवेल उपाध्यक्षदेखील होते. समाजकारण, राजकारण व व्यवसाय सांभाळत त्यांनी आपले एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले आहे. त्यामुळे त्यांचे सर्व क्षेत्रामधून अभिनंदन करण्यात येत आहे. करंजाडेमधील किरण मुंबईकर मित्र मंडळाने ते प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यबद्दल मोठा जल्लोष केला व शुभेच्छा दिल्या.

### रोटरी क्लबतर्फे विविध उपक्रम

**पनवेल** : रोटरी वर्ष २०२४-२५चे मेडीकल डायरेक्टर माजी अध्यक्ष डॉ. लक्ष्मण आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि.२५) पनवेल आरोग्य प्राथमिक केंद्र क्र. १ येथे गरोदर स्त्रियांना प्रोटीनची अधिक मात्रा असलेले पौष्टिक खाद्यपदार्थ क्लबतर्फे देण्यात आले, तसेच गरोदरपणातील चाचणीसाठी लागणारे डॉपलर मशीन स्त्रीरोग तज्ज्ञ रो. डॉ. संजीवनी गुणे यांच्या हस्ते केंद्राच्या संचालिका डॉ. रेहाना मुजावर यांना प्रदान करण्यात आले. या वेळी क्लबचे मेडिकल डायरेक्टर डॉ. लक्ष्मण आवटे यांच्यासह इतर रोटेरियन्स उपस्थित होते. यानंतर रस्त्यावरील, तसेच बाजारपेठेतील गरीब गरजू विक्रेत्यांना मोठ्या छत्र्यांचे वाटप केले.

# मासेमारीसाठी नव्या हंगामाची तयारी

## दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर मच्छिमारांची बंदरात लगबग



**उरण : प्रतिनिधी**

दोन महिन्यांच्या प्रदीर्घ विश्रांतीनंतर १ ऑगस्टपासून मासेमारीचा नवीन हंगाम सुरू होत आहे. यानिमित्ताने तालुक्यातील करंजा, मोरा, दिघोडे व केळवणे, पेणमधील सोनखार, उर्णोली, दादर, रावे तसेच ग्रामीण भागातील अन्य बंदरात तयारी सुरू झाली आहे.

शासनाकडून १ जून ते ३१ जुलैदरम्यान मासेमारीवरील दोन महिन्यांचा बंदी कालावधी १ ऑगस्टला संपणार आहे. त्यासाठी मच्छिमार बांधव दर्याला निघाला असून बंदरावर लगबग सुरू झाली आहे. तालुक्यातील करंजा, मोरा बंदरासह दिघोडे व इतर बंदरातील मच्छिमार १ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या नव्या हंगामाच्या तयारीला लागले आहेत. दोन महिन्यांच्या बंदीनंतर पुन्हा एकदा खोल समुद्रातील मासेमारी सुरू होणार असल्याने खवय्यांची ताज्या मासळीची समस्या दूर होणार आहे.

यासाठी दोन महिन्यांपासून उभ्या करण्यात आलेल्या बोटींची रंगरंगोटी, त्यावरील उपकरणाची इंजीनची डागडुजी, छिद्र पडलेल्या जाळीची दुरूस्ती, तसेच बोटी समुद्रात नेऊन त्यांची तपासणीसह विविध कामे सुरू आहेत.

राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभागाकडून पावसाळ्यात दरवर्षी १ जून ते ३१ जुलै या दोन महिन्यांच्या कालावधी करीता खोल समुद्रात मासेमारीस बंदी घालण्यात येते. यासाठी हा मासळीच्या प्रजननाचा काळ असल्याने बंदीचे कारण शासनाकडून दिले जाते. त्याचप्रमाणे पावसाळ्यात समुद्र खवळलेला असल्याने मासेमारीला जाणाऱ्या मच्छिमारांच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असते, मात्र देशातील इतर राज्यात पावसाळ्यात मासेमारी सुरू असल्याने इतर राज्यातील मासेमारी बोटी या काळात राज्याच्या हद्दीत येऊन मासेमारी करीत असल्याचे मच्छिमारांचे म्हणणे आहे. त्यामुळे या बंदी काळाचा विचार करण्याचीही मागणी पुढे येत आहे.

या कालावधीत करंजा बंदरात मासेमारी करणाऱ्या अनेक बोटीवर मत्स्यव्यवसाय विभागाने कारवाई केली होती. मासेमारी बंदी असल्याने दररोज मिळणाऱ्या ताज्या व मोठ्या मासळीची आवक कमी होते. त्यामुळे खवय्यांना शीतगृहात साठवून ठेवण्यात आलेल्या मासळीवर विसंबून राहावे लागते. हा हंगाम तरी कोणतेही वादळी विघ्ने न येता सुरू व्हावा अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे.

# सततच्या अतिवृष्टीमुळे भाताची रोपे कुजली

## बळीराजा संकटात



**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यात मागील सहा दिवस सतत झालेल्या अतिवृष्टीमुळे भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेतामध्ये लावलेली भाताची रोपे पाण्याखाली आल्याने अक्षरशः कुजून गेली आहेत. आत्ता दुबार पेरणीलाही अवधी नसल्याने बळीराजा संकटात सापडला आहे.

उरण तालुक्याला गेल्या सहा दिवसांपासून पावसाने झोडपले असून त्याचा परिणाम शेतीवरही झाला आहे. ग्रामीण भागातील नदी नाल्यांना पूर येऊन चिरनेर, कळंबुसरे, मोठीजुई, बोरखार, धाकटीजुई, टाकीगाव, विंधणे, दिघोडे, आवरे, गोवठणे, पाले, पिरकोन, खोपटे, चाणजे, नागाव, केगाव आदी भागातील शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधांना खांडी जाऊन पाणी भातशेतीत घुसले आहे. त्यामुळे रोपे कुजली आहेत. पाण्यासोबत शेतात गाळ येऊन बसल्याने शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कुजलेल्या रोपांचे तत्काळ पंचनामे करून तातडीची आर्थिक मदत करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

> **सतत अतिवृष्टीमुळे लागवड करण्यात आलेल्या भातशेतीत गाळासह पाणी घुसले. भाताची रोपे कुजली आहेत. आता शेतकऱ्यांचा मजुरांचा आणि रासायनिक खताचा खर्च वाया गेला असून स्वतः केलेली मेहेनतही वाया गेली आहे. शासनाने तातडीची मदत द्यावी, अशी अपेक्षा आहेत.**
>
> **-बाळकृष्ण पाटील, शेतकरी, कळंबुसरे**

# पनवेलमध्ये पावसामुळे भिंत कोसळून सहा घरांचे नुकसान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात गुरुवारी (दि.२५) झालेल्या मुसळधार पावसामुळे सहा घरांच्या भिंती कोसळून नुकसान झाले आहे. सुदैवाने यात कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

मुसळधार पावसाचा फटका अनेकांना बसला. पनवेल तालुक्यातील केळवणे, शिरढोण, चावणे, धोदाणी, चावनढोली, पाले बुद्रुक या ठिकाणच्या सहा घरांच्या भिंती कोसळून नुकसान झाले. गुरुवारी ११७.६ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली. यावर्षी पनवेल तालुक्यात २५ जुलैपर्यंत एकूण दोन हजार ३२४ मिलिमीटर पाऊस कोसळला आहे. अतिवृष्टी झाल्या मुळे तलाठी सजा मालडुंगे हद्दीतील मालडुंगे (टावरवाडी) येथील जानू धाऊ निरगुडा, वाघाची वाडीतील नामदेव किसन वाघ तर धोदाणी येथील विष्णु ढवळ्या घुटे यांच्या घराच्या भिंती खचून नुकसान झाले आहे. याप्रकरणी तहसीलदार कार्यालयाकडून पंचनामा करण्यात आला आहे.

# सीकेटी महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी) विभागाकडून शुक्रवारी (दि.२६) कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला.

यावर्षी कारगिल विजय दिवसाचे औचित्य साधून लेफ्टनंट अमरजित सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तसेच या कार्यक्रमात रोटरी क्लबचे अध्यक्ष तथा एमएसईबी कार्यकारी अभियंता संजय पाटील, रोटरी क्लबचे सदस्य मेश्राम एकांबे यांनी शहिदांना पुष्पहार अर्पण करून मेणबत्ती प्रज्वलित केली व आदरांजली वाहिली.

यानंतर असोसिएट एनसीसी ऑफिसर मेजर प्रो. (डॉ.) उद्धव भंडारे यांनी कारगिल युद्धाविषयी कॅडेट्सना माहिती दिली, तसेच विद्यार्थ्यांना त्यांचे भविष्य जवान आणि अधिकाऱ्यांप्रमाणे घडवण्यासाठी मन, चेतना आणि विचार या मूलभूत तत्त्वांचा वापर करून त्यांचे अनुकरण करण्यास प्रवृत्त केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागांचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्ग आणि एकूण ३० कॅडेट्स सहभागी झाले होते.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी एएनओ प्रो. (डॉ.) उद्धव भंडारे, लेफ्टनंट नीलिमा तीदार, सीटीओ डॉ. जितेंद्र पावरा आणि सर्व कॅडेट्सनी अथक परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.(डॉ.)एस. के. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ.बी. डी.आघाव यांनी कौतुक केले.



**खारघर : येथील बीएपीएस स्वामीनारायण मंदिराच्या १३व्या पटोत्सवाची सांगता झाली. आमदार प्रशांत ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी संस्थेतर्फे करण्यात येत असलेल्या लोककल्याणकारी कार्याचे कौतुक केले. या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, सचिव विपुल चोटालिया, मंडल उपाध्यक्ष किरण पाटील, वासुदेव पाटील, कुणाल सांगानी, आदित्य हातगे आदी उपस्थित होते.**

# दहा दिवसांनंतरही धोक्याचा इशारा देणारा बावटा कायम

## जेएनपीए, मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस वाहतूक ठप्प



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

दहा दिवसांनंतरही धोक्याचा इशारा देण्यात येणारा तीन नंबरचा बावटा कायम असल्याने गेटवे-एलिफंटा, जेएनपीए, मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक अद्यापही बंदच आहे. यामुळे मात्र लाँचचालक, व्यावसायिकांना रोजीरोटीला मुकावे लागले आहे.

१८ जुलैपासून खराब हवामान, वादळी वाऱ्यासह पावसाचा फटका आणि लावण्यात आलेल्या धोक्याचा इशारा देण्यात येणारा तीन नंबरचा बावट्यामुळे येथील जेएनपीए, मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस या सागरी प्रवासी वाहतुकीलाही मोठ्या प्रमाणावर बसला आहे. गेटवे ऑफ इंडिया येथून पावसाळी हंगामात दररोज सात-आठ तर सुट्टीच्या दिवशी २०-२५ लॉन्चेस सुमारे १००० ते १५०० पर्यटकांना घेऊन एलिफंटा लेण्या पाहण्यासाठी जातात, तर ३० मिनिटांच्या समुद्र सफरीचा आनंद लुटण्यासाठी गेटवे ऑफ इंडिया येथूनच हार्बरसाठी दररोज २५०० ते ३००० पर्यटक येतात, मात्र सर्वच बंदरात धोक्याचा इशारा देणारा तीन नंबरचा बावटा लावल्याने पर्यटन वाहतूक गुरुवारपासूनच ठप्प झाली आहे. यामुळे मात्र लाँच मालकांना दररोज लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्याची माहिती गेटवे ऑफ इंडिया-एलिफंटा जलवाहतूक संस्थेचे अध्यक्ष इक्बाल मुकादम यांनी दिली.

तीन नंबरचा धोक्याचा इशारा देणारा बावटा जोपर्यंत खाली उतरत नाही तोपर्यंत स्थिती राहील अशी प्रतिक्रिया गेटवे-मुंबई बंदर निरिक्षक गुंजन यांनी दिली. पर्यटकांअभावी व्यवसायही मागील पाच दिवसांपासून ठप्प झाला आहे. यामुळे बेटावरील पर्यटक आधारित व्यावसायिकांवर उपासमारीचे संकट आले असल्याचे स्थानिक व्यावसायिकांचे म्हणणे आहे.

भाऊचा धक्का ते मोरा या सागरी मार्गावरुनही गुरुवारी संध्याकाळपासूनच प्रवासी वाहतूक बंद करण्याचा निर्णय मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेने घेतला आहे. यामुळे भाऊचा धक्का ते मोरा आणि जेएनपीए सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक पाच दिवसांपासून कोळमडली असल्याची माहिती मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेचे अनिल परब यांनी दिली.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात कारगिल विजय दिवस



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवारी (दि.२६) कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. या दिवशी १९९९मध्ये भारतीय लष्कराने पाकिस्तानच्या सैन्याला परतवून कारगिल युद्धात विजय मिळवला होता.

कारगिल युद्धातील वीरांच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस संपूर्ण भारतात साजरा करतात. रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही कारगिल युद्धात शहिद झालेल्या वीरांना श्रद्धांजली वाहिली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त सहाय्यक शिक्षण उपसंचालक नाईकवडी सर, प्राचार्या निषा नायर आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. एस.टी.गडदे स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

## संपादकीय

# आता नजर पदकांवर

जगभरातील क्रीडाविश्वात सर्वोच्च प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धांच्या यंदाच्या पर्वाला शुक्रवारपासून फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे सुरूवात झाली. मानवी सांस्कृतिक इतिहासात पॅरिसची विशिष्ट अशी प्रतिमा आहे. पॅरिस म्हणजे चैतन्य, नि:संकोच जीवनानंद. त्यामुळेच गेली अनेक वर्षे परंपरेनुसार चालत आलेल्या ऑलिम्पिक स्पर्धा यंदा पॅरिसमध्ये मात्र परंपरांना छेद देत, चौकटीबाहेर पाऊल टाकतील अशी अपेक्षा आहे.

**उद्घाटनाच्या सोहळ्यापासूनच यंदाच्या ऑलिम्पिक स्पर्धांचे वेगळेपण उलगडत जाण्याची वाट जग पाहात होते. या वेळी उद्घाटन सोहळ्यातील खेळाडूंचे संचलन पहिल्यांदाच स्टेडियमऐवजी थेट सेन नदीच्या पात्रात आयोजिण्यात आले. पॅरिसमधील स्थानिक वेळेनुसार संध्याकाळी साडेसात वाजता तब्बल शंभरेक बोटींमधून जगभरातील दोनशेहून अधिक देशांच्या खेळाडूंची पथके प्रेक्षकांना अभिवादन करत जातील असे हे आयोजन. हा सोहळा सर्व प्रेक्षकांसाठी मोफत ठेवण्याचा आयोजकांचा इरादा होता, परंतु सुरक्षेच्या कारणास्तव केवळ दोन लाख निमंत्रितच सोहळ्याला प्रत्यक्ष उपस्थित राहतील असे अखेरीस ठरले. पॅरिसची ऑलिम्पिक स्पर्धांचे यजमानपद भूषवण्याची ही काही पहिली वेळ नव्हे. लंडनखेरीज पॅरिस हे फक्त दुसरे असे शहर आहे जे तिसऱ्यांदा ऑलिम्पिकचे यजमानपद भूषवत आहे. यापूर्वी १९०० साली तसेच १९२४ साली फ्रान्सने या स्पर्धांचे यजमानपद भूषवले आहे. शंभर वर्षांपूर्वी पॅरिसमध्ये ऑलिम्पिक स्पर्धा पार पडल्या, तेव्हा प्रथमच महिलांना प्रवेश देण्यात आला तसेच ऑलिम्पिक सोहळ्यासाठी प्रथमच ऑलिम्पिक व्हिलेज वसवण्यात आले. नव्याने क्रीडांगणे, इमारती, मैदाने निर्माण केली गेली. पुढे ही संकल्पना इतर देशांनीही स्वीकारली. पॅरिसमध्ये ऑलिम्पिक्सचे आयोजन तरुण पिढीला आकर्षित करेल असे यापूर्वीही मानले गेले होते व यंदाही. अर्थात पॅरिसमधील आयोजन जसे खास आहे तसेच ते सुरक्षिततेच्या दृष्टीने आव्हानात्मकही आहे. ऑलिम्पिक सोहळा पॅरिसनगरीत ११ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. अलीकडच्या काळात पॅरिसमध्ये अनेकदा दहशतवादी हल्ले झाले आहेत. शुक्रवारीही या शहरातील हायस्पीड रेल्वेला दंगेखोरांनी लक्ष्य केल्याच्या बातम्यांनी जगभराचे लक्ष वेधून घेतले. जगात आजच्या घडीला युध्दे चालू आहेत. तरीही सकारात्मकतेने ऑलिम्पिकचे आयोजन पार पाडणेही आवश्यकच आहे. चार वर्षांपूर्वी जपानमधील ऑलिम्पिक सोहळा कोरोनाच्या सावटाने झाकोळला होता. खेळाडू जीव ओतून खेळले, पण त्यांची कामगिरी प्रत्यक्ष पाहणारे प्रेक्षक मात्र नव्हते. पॅरिसमध्ये मात्र पुन्हा एकदा खेळाडूंना जसा हवा असतो तसा प्रेक्षकांच्या उपस्थितीतील खेळांचा अनुभव घेता येईल. टोक्योतील ऑलिम्पिक्समध्ये भारताने सात पदके जिंकली होती. भारताचे असे पाच-सात पदकांवर समाधान मानणे देशातील क्रीडाप्रेमींना नेहमीच खटकते. आपल्याकडे अद्यापही म्हणावी तशी क्रीडासंस्कृती रुजलेली नाही. याविषयी अनेकदा लिहिले-बोलले जाते. अपुरा निधी, क्रीडाक्षेत्रातील राजकारण, भ्रष्टाचार, सुविधांचा अभाव या साऱ्याची परिणती पदके न मिळण्यात होते. परंतु यंदा केंद्र सरकारने जवळपास पाचशे कोटी रुपये खेळाडूंच्या पूर्वतयारीवर खर्च केल्याचे सांगितले जाते. अर्थात निव्वळ तेवढ्याने पदकांची लयलूट होईल असे नाही, परंतु तरीही भालाफेक, नेमबाजी, बॅडमिंटन, टेनिस, थलेटिक्स, बॉक्सिंग, कुस्ती अशा काही क्रीडाप्रकारांत तरी आपले खेळाडू बाजी मारतील, अशी अपेक्षा आहे. भारतीय पथकात यंदा ११७ खेळाडूंचा समावेश असून आताचे भारतीय खेळाडू फक्त सहभागाचे लक्ष्य ठेवत नाहीत तर ते पदक मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवतात हा बदल निश्चितच मोठा म्हणायला हवा.**

# पात्र लाभार्थ्यांना मिळणार हक्काचे घर

सर्वांसाठी घरे -२०२४ही शासनाचे धोरण असून, तसेच राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना स्वत:चे हक्काचे घर मिळावे म्हणून असा शासनाचा प्रयत्न आहे. त्यानुसार राज्यात ग्रामीण व शहरी भागातील बेघरांना घरकूल उपलबध करुन देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येत आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण :- ग्राम विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेतून समाजातील दुर्बल, मध्यमवर्गीय घटकांच्या निवाऱ्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी आवश्यक निकष प्रक्रिया पुढील प्रमाणे :- सामाजिक, आर्थिक, जात सर्वेक्षण सन २०११मधून उपलब्ध झालेल्या प्राधन्यक्रम यादीची माहिती आवास सॉफ्टवर उपलब्ध आहे. या याद्या ग्रामसभेपुढे ठेवून त्यातून पात्र लाभार्थीची निवड करण्यात येते. प्राधान्यक्रम बेघर, एक खोली लाभार्थी, दोन खोली लाभार्थी या प्रमाणे निश्चित केलेली आहे. प्राधान्यक्रम यादीमधील व्यक्तींची ग्रामसभेद्वारे निवड करतेवेळी खालील निकषावरील गुणांकनानुसार प्राधान्यक्रम दिले जातात. या योजनेकरिता वय १६ ते ५९ वयोगटातील प्रौढ व्यक्ती नसलेले कुटूंब, महिला कुटूंबप्रमुख व १६ ते ५९ वयोगटातील प्रौढ व्यक्ती नसलेले कुटूंब, २५ वर्षावरील अशिक्षित/ निरक्षर व्यक्ती असलेले कुटूंब, अपंग व्यक्ती कुटूंब ज्यात शारीरिकदृष्टया सक्षम प्रौढ व्यक्ती नाही. भूमिहीन कुटूंब ज्याचे उत्पन्न स्त्रोत मोलमजुरी आहे. या गुणांकनाच्या आधारे ग्रामसभा यादी तयार करतील व अशा प्रकारे गुणांच्या उतरत्या मांडणीने प्राधान्यक्रम यादी तयार करणेत येईल. प्रती लाभार्थी दिले जाणारे अनुदान ग्रामीण भागात एक लाख २० हजार तर डोंगरी भागात एक लाख ३० हजार रुपये मात्र लाभार्थी निवडीचा अधिकार ग्रामसभेतेस देण्यात आलेला आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामपंचायत किंवा पंचायत समिती येथे अर्ज करावा.

प्रधानमंत्री आवास योजना - शहरी :- गृह निर्माण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेतून शहरी भागातील झोपडपट्टयांचे पुर्नवसन करुन त्यांना एक स्वच्छ सुंदर राहणीमान देण्याचा प्रयत्न आहे.

१. इन-सीटू झोपडपट्टी पुनर्विकास : झोपडपट्ट्याखालील जमिनीवर पात्र झोपडपट्टीधारकांसाठी खाजगी सहभागातून घरे बांधून झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करणेत येते.

२. क्रेडिट-लिंक सबसिडी योजना : नवीन घरे बांधण्यासाठी किंवा सध्याच्या घरांच्या नूतनीकरणासाठी ६ लाख ते १२ लाख रुपयांच्या गृहकर्जावर कमी व्याजदरावर केंद्रीय अनुदानाची तरतूद करण्यात येते. या योजनेमध्ये सहा लाखापर्यंत कर्ज सवलत उपलब्ध आहे.

३. भागीदारीत परवडणारी घरे : राज्ये केंद्रीय एजन्सीमार्फत किंवा ईडब्ल्यूएस श्रेणीसाठी खासगी क्षेत्राच्या भागीदारीतून एक लाख ५० हजार रुपयांच्या केंद्रीय सहाय्याने परवडणारे गृहनिर्माण प्रकल्प उभारण्यात येतात. किमान २५० घरांपैकी ३५ टक्के घरे EWS साठी राखीव ठेवण्यात येतात.

४. लाभार्थ्यांच्या नेतृत्वाखालील वैयक्तिक घर बांधणी/सुधारणा : ईडब्ल्यूएस श्रेणीतील लोक एकतर नवीन घर बांधू शकतात किंवा केंद्र शासनाच्या सहाय्याने एक लाख ५० हजार रुपये आणि राज्य शासनाच्या सहाय्याने एक लाख रुपये अर्थसहाय्य मिळून स्वत:चे घर वाढवू शकतात.

रमाई आवास योजना :- सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेतून अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांचे राहणीमान उंचविण्यासाठी उत्तम दर्जाची घरे बांधण्याकरिता अर्थसहाय्य पुरविण्यात येते. या योजनेत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी २६९ चौ. फुट आकारमानाचे घरकुल बाधण्याकरिता आर्थिक मदत केली जाते.

योजनचे निकषः महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षाचे असावे. स्वत:च्या मालकीचे पक्के घर नसावे. लाभार्थी सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ प्राधान्यक्रम यादीच्या बाहेरील असावा.

या योजनेतून ग्रामीण भागात - एक लाख ३२ हजार रुपये, डोंगराळ नक्षलवादी भागात एक लाख ४२ हजार रुपये, शहरी भागात - दोन लाख ५० हजार रुपये असे अर्थ सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. या योजनेचा लाभ मिळवण्याकरिता ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था येथे संपर्क साधावा.

शबरी/पारधी/आदिम आवास योजना :- आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेत अनुसूचित जमातीकरीता घरे बांधण्यासाठी अर्थ सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. या योजनेत अनुसूचित जमातीतील घटकांसाठी २६९ चौ. फूट आकारमानाचे घरकुल बाधण्याकरीता आर्थिक मदत केली जाते. योजनचे निकषः महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षाचे असावे. या योजनेतून ग्रामीण भागात एक लाख ३२ हजार रुपये, डोंगराळ नक्षलवादी भागात एक लाख ४२ हजार रुपये, शहरी भागात दोन लाख ५० हजार रुपये असे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. या योजनेचा लाभ मिळवण्याकरीता ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था येथे संपर्क साधावा.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत/ वैयक्तिक घरकुल योजना : इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेत विमुक्त जाती आणि भटक्या जमाती प्रवर्गातील घटकांसाठी घरे बांधण्याकरीता अर्थ सहाय्य उपलब्ध करुन दिले जाते. लाभार्थी निवडीचे निकष लाभार्थी कुटुंब हे विमुक्त जाती आणि भटक्या जमाती प्रवर्गातील असावे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. एक लाख २० हजार पेक्षा कमी असावे. पालात राहणारे (गावोगावी भटकंती करून उपजिविका करणारा), लाभार्थी कुटुंब बेघर अथवा झोपडी/ कच्चेवर/पालामध्ये राहणारा असावा/असावेत.

प्राधान्यक्रम:- पालात राहणारे (गावोगावी भटकंती करुन उपजिविका करणारा) घरात कोणही कमावत नाही अशा विधवा, परितक्त्या किंवा अपंग महिला, अनुदानः पूरग्रस्त क्षेत्र. या योजनेतून ग्रामीण भागात - रु. एक लाख २० हजार, डोंगराळ नक्षलवादी भागात रु. एक लाख ३० हजार असे अर्थ सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. या योजनेचा लाभ मिळवण्याकरिता ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था येथे संपर्क साधावा.

मोदी आवास घरकुल योजना : इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेत आवास प्लसमधील प्रतीक्षा यादीत नाव असलेले लाभार्थी , आवास प्लस प्रणालीवर नोंद झालेले परंतु automatic systemद्वारे reject झालेले पात्र लाभार्थी तसेच जिल्हा निवड समितीने शिफारस केलेले लाभार्थी अशा घटकांसाठी घरे बांधण्याकरीता अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. आवश्यक कागदपत्रे ७/१२ उतारा/मालमत्ता नोंदपत्र/ग्रामपंचायत प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, आधारकार्ड, शिधा पत्रिका/निवडणूक ओळखपत्र/विद्युत देयक, मनरेगा रोजगार ओळखपत्र, बँक पासबुक छायांकित प्रत. या योजनेतून ग्रामीण भागात एक लाख २० हजार रुपये, डोंगराळ नक्षलवादी भागात एक लाख ३० हजार रुपये असे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. या योजनेचा लाभ मिळवण्याकरीता ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था येथे संपर्क साधावा.

पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य : ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेतून बेघर व भूमिहीन गरजू घटकांसाठी जमीन खरेदी करण्याकरिता अर्थसहाय्य करण्यात येते. या योजनेतंर्गत ग्रामीण भागात घरकुल बांधण्याकरिता जागा नसलेल्या लाभार्थींना ५०० चौ. फुटापर्यंत जागा खरेदी करण्यास मान्यता दिली जाते. प्रत्यक्ष जागेची किंमत किंवा ५० हजार रुपयांपैकी जे कमी असेल तेवढे अर्थसहाय्य करण्यात येते. शहरी भागात ५००चौ. फुटापर्यंत जागेत स्थानिक प्राधिकरणाच्या बांधकामाच्या नियमावलीनुसार दोन किंवा तीन लाभार्थ्यांच्या संमतीने दोन मजली किंवा तीन मजली इमारत बांधण्यासाठी प्रति लाभार्थी ५० हजार रुपयांपर्यंत अर्थसहाय्य करण्यात येते. या योजनेचा या योजनेचा लाभ मिळवण्याकरिता ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था येथे संपर्क साधावा.

**-प्रवीण डोंगरदिवे,**
**उपसंपादक**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

## बदलते तंत्रज्ञान

### तुमचा चिमुकला कुठेय हे 'ॲपल'चे घड्याळ सांगेल

सध्या स्मार्टफोन काळाची गरज ठरला आहे. स्मार्टफोन अगदी बारीकसारीक गोष्टींसाठी उपयोगी ठरतो आहे, पण याचे दुष्परिणामही तितकेच आहेत. त्यामुळे लहान मुलांना त्यापासून कसं दूर ठेवावं याचे अनेक पर्याय त्यांचे आई-बाबा शोधत असतात. लहान मुलं शाळा, क्लासमध्ये गेल्यावर ते कधी घरी येतील? पावसापाण्यात कुठे अडकले तर नाहीत ना? खेळताना कुठे पडले, तर त्याबद्दल माहिती कोण देईल, असे अनेक प्रश्न पालकांच्या मनात असतात, तर आता ॲपल कंपनी या चिंताग्रस्त पालकांसाठी काहीतरी खास घेऊन आली आहे.



ॲपलने भारतात 'ॲपल वॉच फॉर युअर किड्स' फीचर जाहीर केलं आहे. हे फीचर त्या प्रत्येक पालकासाठी उपयोगी ठरेल, ज्यांना असं वाटतं की, आपल्या मुलांनी कमी वयात स्मार्टफोन वापरू नये, पण तरीही त्या मुलांकडे असं काही डिव्हाइस असावं, जेणेकरून ते नेहमी मुलांच्या संपर्कात राहू शकतील तसेच ते कुठे आहेत, ते काय करत आहेत याचा वेळोवेळी आढावा घेऊ शकतील. म्हणजेच लांब असूनसुद्धा पालक त्यांच्या मुलांशी संवाद साधू शकतील. यादरम्यान ते मुलांना मेसेज, कॉल, त्यांच्या आरोग्य, फिटनेसबद्दलही जाणून घेऊ शकतील, जे सहसा Apple Watchवर मिळतात.


तुमच्या मुलांसाठी ॲपल वॉच सेट करण्याकरिता तुम्हाला पुढील गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील

१. पालकांपैकी किमान एकाकडे तरी आयफोन असला पाहिजे. २. आयफोनबरोबर जोडल्यानंतर मुलाच्या ॲपल वॉचवर हे फीचर सक्रिय केले जाईल. ३. घड्याळात ई-सीम सेट करणे.

मुलांवर कसे नियंत्रण ठेवता येईल?

ॲपल वॉच मुलांना त्यांचं स्वातंत्र्य आणि पालकांना त्यांची काळजी घेण्याची परवानगी देईल. ॲपल वॉचवरून मुलं कोणाशी संपर्क साधू शकतात हे पालक ठरवतील. मुलांचं लोकेशन ट्रॅक करतील. ॲपल वॉचवर DND प्रोफाइल असेल, जे मुलाच्या शाळेचं वेळापत्रक, एक्स्ट्रा क्लासबद्दल माहितीही देईल. केव्हा कोणतं नोटिफिकेशन, कॉल ब्लॉक करायचा या गोष्टींवरसुद्धा आई-बाबा नियंत्रण ठेवू शकतील. आई-बाबा सेटिंग्जमधून डाउनटाइम शेड्युल करू शकतील. तुम्ही डाउनटाइम सेट केल्यावर, फक्त निवडलेले फोन कॉल आणि निवडक ॲप्समध्येच मुलं प्रवेश करू शकतील.

# महान व्यक्तिमत्व डॉ. एपीजे अब्दुल कलाम



## निमित्त

अब्दुल कलाम हे भारताचे अकरावे आणि पहिले गैर-राजकीय राष्ट्रपती होते, ज्यांना तंत्रज्ञान आणि विज्ञानातील त्यांच्या विशेष योगदानामुळे हे पद मिळाले. ते एक अभियंता आणि शास्त्रज्ञ होते. कलाम हे २००२-०७पर्यंत भारताचे राष्ट्रपतीही होते. राष्ट्रपती झाल्यानंतर कलाम हे सर्व देशवासीयांच्या दृष्टीने अत्यंत आदरणीय आणि कर्तृत्ववान व्यक्ती आहे. त्यांचा आज स्मृतिदिन. त्यानिमित्त घेतलेला आढावा...

अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी धनुष्कोडी गावात रामेश्वरम (तामिळनाडू) येथे एका मच्छीमार कुटुंबात झाला होता. ते तमिळ मुस्लिम होते. त्यांचे पूर्ण नाव डॉ. अबुल पाकीर जैनउल्लाब्दीन अब्दुल कलाम आहे. त्यांच्या वडिलांचे नाव जैनुलाब्दीन होते. ते एका मध्यमवर्गीय कुटुंबातील होते. वडील मच्छीमारांना बोट देऊन घर चालवत असत. बाल कलाम यांनाही त्यांच्या शिक्षणासाठी खूप संघर्ष करावा लागला. ते घरोघरी वर्तमानपत्रे वाटायचे आणि त्या पैशातून शाळेची फी भरायचे.

अब्दुल कलाम यांचे सुरुवातीचे शिक्षण रामेश्वरम प्राथमिक शाळेत झाले. १९५०मध्ये कलाम यांनी बीएससीची परीक्षा सेंट जोसेफ कॉलेज येथून पूर्ण केली. यानंतर त्यांनी १९५४-५७मध्ये मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) मधून एरोनॉटिकल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा केला. लहानपणी फायटर पायलट होण्याचे त्यांचे स्वप्न होते, पण हे स्वप्न काळानुसार बदलले.

१९५८मध्ये कलाम हे डीटीडी आणि पी. मधील तांत्रिक केंद्रात वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून काम करू लागले. येथे राहून त्यांनी प्रोटोटाईप हॉवर क्राफ्टसाठी तयार केलेल्या वैज्ञानिक संघाचे नेतृत्व केले. आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीला ते लष्करासाठी एक छोटे हेलिकॉप्टर डिझाइन केले होते. १९६२मध्ये त्यांनी संरक्षण संशोधन सोडून भारताच्या अंतराळ संशोधनात काम करायला सुरुवात केली. १९६२ ते ८२ या काळात त्यांनी या संशोधनाशी संबंधित अनेक पदे भूषवली. १९६९मध्ये कलाम भारताच्या पहिल्या एसएलव्ही-३ (रोहिणी)च्या वेळी इस्रोचे प्रकल्प प्रमुख बनले. १९९७मध्ये कलाम यांना विज्ञान आणि भारतीय संरक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी भारताचा सर्वोच्च सन्मान भारतरत्न प्रदान करण्यात आला.

२००२मध्ये कलाम हे भारतीय जनता पक्ष समर्थित एनडीए घटकांनी राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या वेळी उमेदवार बनवले, ज्याला सर्वांनी पाठिंबा दिला आणि १८ जुलै २००२ रोजी कलाम यांनी पदाची शपथ घेतली. ते कधीच राजकारणाशी संबंधित नव्हते. तरीही ते भारताच्या सर्वोच्च राष्ट्रपती पदावर राहिले. जीवनात सुखसोयींचा अभाव असतानाही ते राष्ट्रपती पदापर्यंत कसे पोहचले ही गोष्ट आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. २७ जुलै २०१५ रोजी शिलाँगला एका कार्यक्रमादरम्यान ते खाली पडले. त्यानंतर रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. **(साभार : वेबदुनिया)**

## क्लिक...क्लिक...!




**मुरूड : परिसरात गुरुवारच्या वादळी पावसामध्ये वारा वेगाने वाहत होता. किनारी असलेली नारळाची झाडे वेडीवाकडी होत असल्याने वाऱ्याचा वेग किती प्रमाणात असेल याचा अंदाज छायाचित्रामधून होत आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### पावसाळ्यात खाण्या-पिण्याच्या बाबतीत 'या' चुका करू नका!

सध्या पावसाळा सुरू आहे. पावसाळा हा असा ऋतु आहे जो अनेकांना आवडतो. हिरव्या निसर्गाचे सौंदर्य न्याहाळण्यासाठी पावसाळ्यात अनेक जण घराबाहेर पडतात, पण त्याचबरोबर पावसाळ्यात आरोग्याची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. केस ओले न ठेवणे, उबदार कपडे घालणे, नेहमी छत्री बरोबर ठेवणे इत्यादी गोष्टी तुम्ही पाळत असाल, पण पावसाळ्यात तुम्ही काय खाता हेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. पावसाळा हा जरी अतिशय सुंदर वाटत असला तरी या दरम्यान आजारी पडण्याचा धोका खूप जास्त असतो. 'फिटेलो'चे संस्थापक आहारतज्ज्ञ मॅक सिंग यांनी पावसाळ्यात खाण्याच्या बाबतीत खालील चुका करू नका, असा सल्ला दिला आहे.



लिंबूवर्गीय फळे हे व्हिटॅमिन सीचा एक उत्तम स्त्रोत आहेत. व्हिटॅमिन सी रोग प्रतिकारशक्ती टिकवून ठेवते, पण अति आंबटपणामुळे अनेक जण पावसाळ्यात लिंबूवर्गीय फळे खाणे टाळतात, ज्यामुळे त्याचा थेट परिणाम व्यक्तीच्या प्रतिकारशक्तीवर होतो. जर तुम्हाला लिंबूवर्गीय फळे खायला आवडत नसतील तर तुम्ही पदार्थांवर लिंबू पिळा किंवा लिंबाचे पेय बनवा. याला पर्याय म्हणून तुम्ही पेरू, पपईसुद्धा खाऊ शकता. यामध्येसुद्धा व्हिटॅमिन सी हा एक उत्तम स्त्रोत आहे.

जर तुम्हाला पावसाळ्यात तुमचा घसा निरोगी ठेवायचा असेल तर फ्रिजचे पाणी पिणे टाळा. फ्रिजच्या थंड पाण्यामुळे आपल्या घशात इनफेक्शन होऊ शकते. त्याऐवजी मडक्यातील पाणी प्या. हे पाणी आपली तहान भागवते व त्याचबरोबर हार्मोन्स संतुलित ठेवण्यास मदत करते आणि सनस्ट्रोकपासून वाचवते.

हंगामी फळे, भाज्यांचे सेवन करणे गरजेचे आहे; कारण जेव्हा तुमच्या भागात पिकवलेली हंगामी फळे किंवा भाज्या तुम्ही खाता, तेव्हा तुम्हाला आरोग्यास फायदा मिळू शकतो. बाहेरून आयात केलेली फळे किंवा भाज्या या कृत्रिमरित्यासुद्धा बनवल्या जातात. त्यामुळे अशा भाज्या किंवा फळांपासून फायदा मिळेलच, हे सांगता येत नाही.

पावसाळ्यात तळलेले पदार्थ खायला प्रत्येकाला आवडते. अनेक जण चहाचा स्वाद द्विगुणित करण्यासाठी त्याबरोबर पकोडेसुद्धा खातात. तळलेल्या पदार्थांमुळे अनेकदा पोट खराब होते. तसेच पावसाळ्यात फार तहान लागत नाही, त्यामुळे बऱ्याचदा आपण खूप जास्त पाणी पित नाही, ज्यामुळे डिहायड्रेशन होण्याची शक्यता वाढते, पण दररोज अडीच ते तीन लिटर पाणी पिणे गरजेचे आहे.

# बल्लाळेश्वर मंदिराकडील रस्ता खड्डेमय

## * नागरिकांची मार्ग काढताना तारेवरची कसरत

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली येथील श्री बल्लाळेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची खूप दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. पाली नगरपंचायत तर्फे या ठिकाणी तात्पुरती उपाययोजना म्हणून खडी टाकण्यात आली होती, मात्र ही खडी बाहेर येऊन पुन्हा मोठाले खड्डे पडले असून पावसाचे पाणी साठून त्यांना तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. परिणामी येथून मार्ग काढतांना भाविक, पादचारी, विद्यार्थी व वाहन चालक यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.





काही दिवसांपूर्वी खड्डे भरण्यासाठी टाकलेल्या खडीवरून घसरून पाच ते सहा बाईकस्वार जखमी झाले होते. वाहने जाऊन आता ही खडी आजूबाजूला पसरली असून त्या ठिकाणी आणखी मोठे खड्डे तयार झाले आहेत तसेच या खड्ड्यांमध्ये पाणी साचून राहते. आणि वाहतुकीला व चालण्यास अडथळा निर्माण होत आहे. शिवाय खड्ड्यात वाहने जोरात आदळतता, तसेच खड्ड्यातील पाणी आजूबाजूला असलेल्या दुकानांत व पादचाऱ्यांवर उडून त्यांना हकनाक त्रास सहन करावा लागतो. याच ठिकाणी सब रजिस्ट्रेशन ऑफिसदेखील आहे. इतर व्यापारी दुकाने आहेत. त्यांनासुद्धा या खड्ड्यांचा त्रास होत आहे.

**हा रस्ता खूप खराब झाला आहे. येथून मार्ग काढणे गैरसोईचे होत आहे. येथे टकलेल्या खडीवरून घसरून अनेक बाईकस्वार जखमी झाले आहेत. आता खड्ड्यांमध्ये पाणी साचून मोठ्या प्रमाणावरती तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. वयस्कर लोक व विद्यार्थ्यांना येथून जातांना सर्वाधिक त्रास होतो. हा रस्ता योग्य प्रकारे सुस्थितीत करणे गरजेचे आहे.**

**–सुशील शिंदे, पाली, शहर अध्यक्ष, भाजप**

# खालापूरात अवजड वाहनांचे सतत अपघात

## नागरिक भीतीच्या छायेत

**खोपोली : प्रतिनिधी**

मंगळवारी रात्री शहरातील मुख्य रस्त्यावर कॉइलचा ट्रेलर पलटी झाल्याची घटना घडली असून, सुदैवाने रात्रीची वेळ असल्यामुळे मोठी जीवितहानी टळली. तालुक्यात अवजड वाहनांचे सातत्याने अपघात घडत असून १५ दिवसांत एक बळी, एक गंभीर जखमी तर सहा किरकोळ जखमी झाले आहेत. अवजड वाहनांचे अपघात खालापूर तालुक्यासाठी डोकेदुखी ठरत आहे.



११ जुलैला ओंकार आडकर या २७ वर्षे तरुणाला भरधाव कंटेनर ने चिरडल्याची घटना जुन्या मुंबई–पुणे महामार्ग घडली होती. या घटनेला चार दिवस उलटत नाही तोच खालापूर शहरात बेदरकार कंटेनर चालकाने एका आयुष्याच्या पायावरून कंटेनर नेल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्यानंतरसुद्धा अवघड वाहनाचे अपघात थांबण्याचे नाव घेत नसून सावरोली खारपाडा राज्य मार्गावर गॅसवर ट्रक उलटल्याने मोठी दुर्घटना ओढावली होती, परंतु सुदैवाने सिलेंडर मध्ये गॅस नसल्याने संभाव्य दुर्घटना टळली होती. या घटनेला २४ तास उलटत नाही तोच याच मार्गावर वाशिवली गावानजीक रसायणाचा टँकर उलटला. मंगळ रात्री शहरातील मुख्य रहदारीचा रस्ता असलेला तहसील कार्यालयासमोर कॉईल नेणारा ट्रेलर दुभाजक तोडून पलटी झाला. कित्येक टन वजनाची लोखंडी कॉइल रस्त्यात फेकली गेली, परंतु सुदैवाने रात्रीची वेळ असल्याने प्रवासी, पादचारी नसल्याने जीवित हानी टळली.


रात्रीच्या वेळेस अवजड वाहतूक करणारे चालक अनेकदा नशा करून असल्याचे उघडकीस आल्याने पोलिसांनी चालकांवर कारवाईसाठी पाऊल उचलावे, अशी मागणी होत आहे.

# अलिबागजवळ बार्जमध्ये अडकलेल्या १४ जणांची सुटका

**अलिबाग : प्रतिनिधी**

समुद्रात भरकटून अलिबाग येथील कुलाबा किल्ल्याजवळ आलेल्या जेएसडब्ल्यू कंपनीच्या बार्जमध्ये अडकून पडलेल्या १४ जणांना तटरक्षक दलाने हेलिकॉप्टरच्यासहाय्याने शुक्रवारी (दि. २६) सुखरूप बाहेर काढले.





जेएसडब्ल्यू कंपनीचे हे बार्ज धरमतरकडून जयगडच्या दिशेने कोळसा घेऊन निघाले होते. गुरुवारी खराब हवामान, सोसाट्याचा वारा आणि कमी दृष्यमानता यामुळे भरकटले होते. वादळी वाऱ्यामुळे हे बार्ज भरकटले. वादळी वाऱ्यामुळे अलिबाग येथील कुलाबा किल्ल्याच्या मागील बाजूस असलेल्या समुद्रात ते अडकून पडले होते. इंजिनमध्ये पाणी शिरल्याने खलाश्यांनी हे बार्ज याच ठिकाणी नांगरून ठेवले होते.

गुरुवारी रात्री बार्जमधील खलाश्यांच्या सुटकेसाठी स्थानिक यंत्रणांच्या मदतीने प्रयत्न सुरू करण्यात आले होते, मात्र अंधार आणि खराब हवामानामुळे खलाश्यांची सुटका होऊ शकली नव्हती. शेवटी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयांनी मदत व बचावासाठी तटरक्षक दलाशी संपर्क केला.

शुक्रवारी सकाळी पावसाने उघडीप दिल्यानंतर मुंबईतून सिजी ८१० हेलिकॉप्टर आकाशात झेपावले. अवघ्या काही मिनटात ते अलिबागच्या कुलाबा किल्ल्याजवळ दाखल झाले. तटरक्षक दलाचे दोन जवान भरकटलेल्या जहाजावर उतरले. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर सात टप्प्यात सर्व खलाश्यांची बोटीवरून सुटका केली. नंतर त्यांना आरोग्य तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले.

या वेळी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड पोलीस अधीक्षक सोमानाथ घार्गे, मुरूड जंजिरा तटरक्षक दलाचे कमांडट राजेश धाऊलखांडी, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के उपस्थित होते.

# रोह्यात पुरग्रस्तांसाठी भाजप युवा मोर्चाकडून मदतकार्य

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात मुसळधार पावसामुळे कुंडलिका नदीने धोक्याची पातळी गाठली व पुर परिस्थिती निर्माण केली. यामुळे अनेक नागरिकांच्या घरामध्ये पाणी गेले व त्यांचे नुकसान झाले. २००५ नंतर पहिल्यांदाच एवढे पाणी आले होते. रोहातील नागरिकांना या पुरपरिस्थितीमध्ये सहकार्य लाभावे म्हणुन यावेळी भारतीय जनता युवा मोर्चा दक्षिण रायगडचे सरचिटणीस रोशन चाफेकर यांच्या पुढाकाराने पूरग्रस्त कुटुंबाना विविध खाद्यपदार्थ यांचे किट बनवुन ते वाटप करण्यात आले.

किटच्या माध्यमातुन कुटुंबाना तात्पुरता दिलासा मिळाला.



तसेच आपतकाल व्यवस्थेसाठी ॲम्ब्युलन्सची सुविधा सुद्धा उपलब्ध करण्यात आली होती. पुरामुळे ज्यांचे नुकसान झाले आहे तिथे पंचनामा होऊन कुटुंबाना शासकीय मदत मिळणे आवश्यक आहे, त्या संदर्भातील पाठपुरावा आम्ही करूच मात्र नागरिकांना तातडीची मदत व दिलासा मिळावा म्हणुन युवा मोर्चा टीमकडुन ही तातडीचे सहकार्य करण्याचा आम्ही प्रयत्न केला. जिथे जिथे नागरिकांना गरज भासेल तिथे तिथे भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा तसेच महिला मोर्चा सुद्धा नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर असतील असे रोशन चाफेकर यांनी सांगितले. या वेळी रोहातील विविध भागात नागरिकांची भेट घेऊन त्यांची चौकशी करून आढावा घेतला.

सेवाभावी कार्यात दक्षिण रायगड युवा वॉरिअर्स संयोजक वैभव कुळकर्णी, रोहा शहर युवा मोर्चाचे अनिल घरजाळे, परेश चितळकर, रोहित रोठे निखिल बोरोले, राकेश चाफेकर यांनी मोलाचे कार्य केले.


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**CHANGU KANA THAKUR ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE**

**NEW PANVEL (AUTONOMOUS)**

Plot No.1, Sector-11, Khanda Colony, New Panvel (West), Tal.Panvel, Dist.-Raigad – 410206

Applications Are Invited For The Following **Clock Hour Basis** Posts For The Academic Year **2024-25**

**AIDED**

| Sr.No. | Cadre | Subjects | Total No. CHB Posts | Category |
|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Professor | History | 02 | 02 - Open |
| 2 | Assistant Professor | Chemistry | 02 | 02 - Open |
| 3 | Assistant Professor | Zoology | 01 | 01 - Open |
| 4 | Assistant Professor | Microbiology | 05 | 05 - Open |
| 5 | Assistant Professor | Political Science | 01 | 01 - Open |
| 6 | Assistant Professor | Botany | 01 | 01 - Open |
| 7 | Assistant Professor | Commerce & Accountancy | 04 | 04 - Open |

The above posts are open to all, however candidates from any category can apply for the post. Reservation for women be as per University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special /Cell/ ICC/2019-20/05 dated 5th July, 2019.Candidates having knowledge of Marathi will be preferred."Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018, Government of Maharashtra Resolution No. Misc-2018.C.R.56/UNI-1, dated 8th March, 2019 and University Circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, Dated 26th March, 2019 and revised from time to time". Remuneration of the above post will be as per University Circular No. TAAS/(CT)/01/2019-2020, Dated 02nd April 2019 & University Circular No. CTAU/23/2021-2022, Dated 25th January, 2022.The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.in

Application with full details should reach to the **CHAIRMAN, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel, C/o. Changu Kana Thakur Arts, Commerce and Science College, New Panvel (Autonomous), Plot No.1, Sector-11, Khanda Colony, New Panvel (W), Tal.-Panvel, Dist.-Raigad**, within **15 days** from the date of publication of this advertisement.

**This is University approved advertisement.** If required **Contact: Shri.Pralhad Thakur - 9022600288**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
**Chairman, J.B.S.P. Sanstha, Panvel**


# नागोठण्यातील पुराचे पाणी ओसरले

## जनजीवन पुर्ववत

**नागोठणे : बातमीदार**

बुधवार, गुरुवार दिवस रात्र पडत असलेल्या मुसळधार पावसानमुळे अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने नागोठण्यात महापुर आला होता. गुरुवारी रात्री उशीरा पावसाने विश्रांती घेतल्यानंतर शुक्रवारी पुराचे पाणी ओसरले असून जनजीवन पूर्ववत झाले असून नागोठणे बाजारपेठमधील दुकानदार व पूरग्रस्त भागातील नागरिक आपली दुकाने व घरांची साफसफाई करण्यात व्यस्त आहेत.



दरम्यान, नागोठणे ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक किशोर जैन यांनी रोहा प्रांत व तहसीलदार यांना पुरामुळे नुकसान झालेल्या नागोठणे व विभागातील दुकानदार व नागरिकांच्या नुकसानीचे पंचनामे आजच्या आज करून त्यांना शासनाकडून देण्यात येणारी ५००० रुपयांची मदत तत्काळ द्या, अशा सूचना केल्या आहेत.

नागोठणे ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक किशोर जैन हे पूरग्रस्त परिस्थितीतीकडे जातीने लक्ष देऊन होते तसेच ग्रामपंचायत प्रशासनाला पूरग्रस्त ग्रामस्थांकडे लक्ष देऊन त्यांना जी काही मदत लागेल ती सर्व मदत करण्याची सूचना देत होते. किशोरभाई जैन यांच्या सुचने नुसार ग्रामपंचायत प्रशासनाने पूरग्रस्त नागरिकांना जेवणाचे किट देऊन त्यांच्या जेवणाची ही व्यवस्था केली होती.

ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी राकेश टेमघरे यांना किशोरभाई जैन यांनी पूरग्रस्त भागातील साफसफाईकडे लक्ष देण्याच्या सूचना केल्यानंतर राकेश टेमघरे यांनी तत्काळ ग्रामपंचायतीच्या सफाई कर्मचाऱ्यांना साफसफाईसाठी कामाला लावले असून दिवसभरात पूरग्रस्त भागाची सफसफाईचे कामकाज युद्ध पातळीवर सुरू असून सर्व पूरग्रस्त भागाची साफसफाईदेखील पूर्ण झाली आहे.

### आमदार रविशेठ पाटील यांनी केली पाहणी

***पेण सुधागड रोहा विधानसभा मतदार संघांचे आमदार रविशेठ पाटील यांनी शुक्रवारी (दि. २६) नागोठणे पूरग्रस्त भागाची पाहणी केली. नुकसानग्रस्त दुकानदार व ग्रामस्थांची विचारपुस करून नुकसाना बाबत चौकशी केली तसेच नुकसानग्रस्त नागरिकांना सर्वोतोपरी सहयोग करून नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून शासकीय मदत तत्काळ द्या, असे आदेश प्रशासनाला दिले.***

# एटीएम फोडणारे दोघे अटकेत

**खोपोली :** चोरट्यांचा एटीएम फोडून रक्कम चोरी करण्याचा प्रयत्न फसल्यानंतर एटीएममधील ७५ हजार रुपये किमतीची यंत्रसामुग्री चोरून नेल्याची घटना खालापूरातील खिरकींडी गाव येथे घडली आहे. खालापूर पोलिसांनी वेगात तपास करत या गुन्ह्यात कमलदिप हरिलाल पटेल (२०) आणि दीपकलाल अमृतलाल वर्मा (२१, दोघे सध्या रा. खिरकींडी, मूळ उत्तर प्रदेश) यांना अटक केली आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड–४१०२०६**

E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in

दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२७७८ फॅक्स – ०२२–२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. १८ (ई-निविदा) सन २०२४-२५**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२–२७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप– या निविदेमध्ये एकूण १ काम समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २६.०७.२०२४ सकाळी १०.०० ते दिनांक ०२.०८.२०२४ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई–निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : २७/०७/२०२३**

**सही/–**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**


# खोपोलीत दिव्यांग लाभार्थी चार महिन्यांपासून पेन्शनच्या प्रतीक्षेत

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषदेने गेल्या आठ महिन्यांपासून शहरातील दिव्यांगाना दरमहा ७५०रूपये पेन्शन योजना लागू केली असून पात्र लाभार्थी दिव्यांगाना गेले चार महिने उलटून गेले तरी पेन्शनची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा झालेली नाही. त्यामुळे दिव्यांगाना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मुख्याधिकारी पंकज पाटील यांनी पेन्शनबाबतीत तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी केली जात आहे.

नगरपालिकेने सन २३–२४च्या अर्थ संकल्पामध्ये पालिका उत्पनातून दिव्यांगासाठी पाचटक्के निधीची तरतुद केली असून त्या रक्कमेतून पालिका हद्दीतील पात्रधारक लाभार्थीना दरमहा ७५० रूपये रक्कम पेन्शन स्वरुपात सुरू केल्याने ज्यांनी आपला प्रस्ताव पालिकेकडे दाखल केला गेला आहे, अशा पात्र लाभार्थीच्या बँक खात्यात दरमहा पेन्शन जमा केली जात असल्याने दिव्यांगाना मोठा दिलासा मिळत आहे.

या पैशातून काही दिव्यांगाना महिन्याच्या औषधा साठी हातभार लागतो, परंतु गेल्या चार महिने ही पेन्शनची रक्कम मिळाली नसल्यामुळे अनेक अडचणीना सामोरे जावे लागत आहे. मुख्याधिकारी यांनी तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी दिव्यांगकडून केली जात आहे.

**गेल्या दोन महिन्यांपूर्वी लोकसभेच्या निवडणूकीसाठीची आचारसंहिता होती. आचारसंहितेमुळे पेन्शनची रक्कम जमा केली नाही, पुढील आठवड्याभरात लाभार्थीच्या बँक खात्यात पेन्शनची रक्कम जमा केली जाईल.**

**–गौतम भगले, उपमुख्याधिकारी,**
खोपोली नगर परिषद

# सेजल साबळेला आरोग्य मानसशास्त्रात पदव्युत्तर पदवी

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांची द्वितीय सुकन्या सेजल ही इंग्लंड येथील (लंडन) मँचेस्टर मेट्रोपॉलिटन युनिव्हर्सिटीमध्ये आरोग्य मानसशास्त्र (हेल्थ सायकोलॉजी) विषयात पदव्युत्तर पदवी (मास्टर डिगरी) घेऊन उत्तीर्ण झाली आहे. त्याबद्दल सेजलचे सर्व स्तरातून कौतुक होत असून अभिनंदन करण्यात येत आहे.

मानसशास्त्र हा विषय अत्यंत कठीण आणि अवघड समजला जातो. हा विषय लाखो विद्यार्थ्यांपैकी मोजकेच विद्यार्थी निवडतात, मात्र त्यातील हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच उत्तीर्ण होतात. सेजल राजीव साबळे हीचे शालेय शिक्षण माणगाव येथे झाले असून उच्च शिक्षण (एम.ए.सायकोलॉजी) पुणे येथून अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण झाली. त्यानंतर सेजलने लंडन येथील मँचेस्टर युनिव्हर्सिटीमध्ये पदव्युत्तर पदवी शिक्षणासाठी प्रवेश घेतला. सेजलने एक दुर्मीळ विषय निवडून आव्हान स्विकारले आहे.


**पेपर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्याचे विद्यमान मालक आनंदिबाई काशिनाथ घरत ऊर्फ आनंदि कमलाकर घरत यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे: विंधणे (५५३३२४)**
(**ULPIN ३४६११११०६५१९**), **तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २५५/१ खाते क्रमांक : ६० | १ | १.४९.७० पो.ख. ०.१०.४० | १७.९१ |
| | | एकुण १.६०.१० | |

**या एकुण क्षेत्रापैकी विकेते यांच्या हिश्याचे ०.१६.०० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक: २७ जुलै २०२४**

**सही**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

पत्ता :– बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड – ४१०२०६ मो. क्र. ९९२०४७५८०१



**उरण नगरपरिषद, उरण**

**जिल्हा : रायगड**

**प्रथम संक्षिप्त ई-निविदा सूचना क्रमांक**
**उनप/बांवि/०१/२०२४-२०२५**

उरण नगरपरिषद क्षेत्रातील जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२३–२४ करिता खालील तक्त्यात नमूद कामांची संपूर्ण तपशिलासह सविस्तर ई–निविदा https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| (१) | उरण नगरपरिषद विकास आराखडयातील म्हातवली स.नं.७५अ मधील १२.०० मी. रुंदीचा रस्ता विकसित करणे. | रुपये १,११,८१,३५१/– |
| (२) | उरण नगरपरिषदेचे म्हातवली स.नं.७५अ मधील कार्यालयीन इमारतीचे सभोवताली कंपाऊंड वाल बांधणे. | रुपये ५१,९६,७०१/– |
| (३) | उरण शहरात कायदा सुव्यवस्था व सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. सर्व्हेंल्स यंत्रणा उभारणे. | रुपये १,६१,१४,०९७/– |

तरी अर्हता प्राप्त इच्छुक निविदाकारांनी दिनांक २९–०७–२०२४ ते दिनांक ०५–०८–२०२४ या कालावधीत वरील संकेतस्थळावर रितसर निविदा अपलोड करावी.

जा.क्र. उनप/बांवि./७८०/२०२४–२०२५
दिनांक :– २६/०७/२०२४

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**

# प्रत्येक खेळात मेंटल फिटनेसही महत्त्वाचा -स्वस्तिका घोष



**विविध क्षेत्रांमधील अधिकारी, पदाधिकारी आणि तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती 'रामप्रहर'च्या संवादप्रहर सदरामध्ये दर शनिवारी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. यामध्ये मान्यवर आपले विचार, मते आणि माहिती मांडणार असून विविध घडामोडींबद्दल भाष्य करतील. वाचकांसाठी हे सदर माहितीपूर्ण आणि उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे. आजच्या मुलाखतीमध्ये राष्ट्रीय टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष हिच्याशी संवाद साधला आहे.**

राम प्रहर संवादप्रहर

खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी असलेल्या स्वस्तिका घोषने आजवर अनेक स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. स्वस्तिकाने विविध स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करून उल्लेखनीय म्हणजेच डब्ल्यू टी टी फिडर तुर्की ओपनसह तीन जागतिक रँकिंग स्पर्धांमध्ये तिचा सहभाग होता. हाँगकाँग, जॉर्डन, कोलंबो, ओमान आदी देशांत झालेल्या स्पर्धेत अजिंक्यपद पटकावून भारताची मान उंच ठेवण्याचा प्रयत्न केला. ओमान येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तिने भारतीय कर्णधारपद म्हणूनही जबाबदारी पार पाडली. या स्पर्धेत तीन ब्राँझ पदके मिळविणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे. प्रत्येक खेळामध्ये मेंटल फिटनेसही महत्त्वाचा असल्याचे ती संवादप्रहरमधील मुलाखतीमध्ये म्हणाली.

**१. स्वस्तिकाजी आपल्याला टेबल टेनिस या खेळाची आवड कशी निर्माण झाली. आज टेबल टेनिस खेळात जागतिक क्रमवारीमध्ये कोणत्या स्थानावर आहात?**

माझे वडील टेबल टेनिसचे प्रशिक्षक म्हणून काम करतात. त्यांच्याकडे प्रशिक्षणासाठी अनेक विद्यार्थी येत असत. मी साडेतीन वर्षांची असताना तिथे जात असे त्यातून मला आवड निर्माण झाली. माझी उंची कमी असल्याने हात पोहचत नसे तरी मी खेळण्याचा प्रयत्न करीत असे. ते पाहून माझ्या वडिलांनी मला खेळण्यास प्रोत्साहन दिले. तेच माझे प्रशिक्षक होते. मला खेळ शिकवण्यासाठी त्यांनी आपली शाळेतील नोकरी सोडली. त्यांच्यामुळे मी नवव्या वर्षी नॅशनल चॅम्पियन बनले. महिला टेबल टेनिसमध्ये जागतिक स्तरावर १५१व्या क्रमांकावर आहे. तर युवा खेळाडूमध्ये जागतिक चौथ्या स्थानावर आहे.

**२. आपले शिक्षण कोठे झाले?**

मी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये तिसरी ते बारावीपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर आता खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात बीएमएसचे शिक्षण घेत आहे. मला शाळेने खूप मदत केली सरावासाठी जागा उपलब्ध करून दिली.

**३. आपल्याला या खेळात पुढे येण्यासाठी कोणी मदत केली?**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर साहेबांनी मला खूप मदत केली. नेहमीच मला वेगवेगळ्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक मदत केली. याशिवाय विराट कोहली फाउंडेशन त्यामुळे मी आज इथंपर्यंत पोहचली आहे. त्यांचे आभार मानून मी त्यांना धन्यवाद देते.



**४. पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा कोठे खेळली व त्यावेळचा अनुभव कसा होता?**

मी पहिल्या प्रथम आंतरराष्ट्रीय स्पर्धा ज्युनिअर गटात चायनामध्ये नंतर एशियन चॅम्पियनशिप बँकॉकला खेळले त्यावेळी मला अनेक नामवंत खेळाडूंचा खेळ पाहायला मिळाला. त्यांना जवळून बघताना खूप चांगले वाटले. टेबल टेनिसमध्ये प्रथम क्रमांकावर असलेल्या चायनाच्या खेळाडुंबरोबर खेळण्याचा अनुभव आणि आनंद वेगळाच होता. ज्युनिअर मध्ये मी चायनाच्या तीन चार खेळाडूंना हरवून आपल्या देशासाठी मेडल मिळवले आहेत.

**५. टेबल टेनिसचा सराव कसा आणि केव्हा करता आणि अभ्यास कधी करायचात?**

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये मला सरावासाठी खास रूम दिली होती. त्याठिकाणी मी वडिलांनाच्या मार्गदर्शनाखाली रोज सहा ते सात तास सराव करायची. माझा शाळेचा अभ्यास ही वेळ काढून करायची मला शिक्षक मदत करीत असत.

**६. पहिले आंतरराष्ट्रीय मेडल जिंकून आल्यावर शाळेतील वातावरण कसे होते?**

माझा शाळेत सत्कार करण्यात आला. शाळेत आणि खारघरमध्ये माझे पोस्टर लावण्यात आले होते. मला खूप छान वाटले. त्यामुळे इतर मुलांनापण प्रोत्साहन मिळाले. आज शाळेतील आणि खारघरमधील अनेक मुले या खेळाकडे आकर्षित झाली आहेत. ती नेहमी प्रॅक्टीस करताना दिसतात. रामशेठ ठाकूर स्कूलने खेळाला प्राधान्य दिले आहे. खेळाडूंना प्रत्येक वेळी प्रोत्साहन दिले जाते.

**७. पहिले आंतरराष्ट्रीय मेडल जिंकल्यानंतर पहिली कोणाची आठवण आली?**

मला आतापर्यंत ३५पेक्षा जास्त मेडल मिळाली आहेत, पण पहिले आंतरराष्ट्रीय मेडल जिंकल्यानंतर प्रथम मला स्वाभाविकच वडिलांची आठवण आली कारण त्यांची लहानपणापासून हा खेळ शिकवला होता. माझ्यासाठी मेहनत घेतली होती. माझ्याकडून तासन तास स्वत: सराव करून घेतला होता. माझ्यासाठी त्यांनी आपली नोकरी ही सोडली होती.

**८. ऑलिम्पिकला जाण्याची संधी मिळणार आहे का?**

ऑलिम्पिक २०२४मध्ये जाण्याची संधी मला मिळणार नाही कारण त्यासाठी देशातील पहिल्या तीन क्रमांकाच्या खेळाडूंना संधी दिली जाते. या वेळी माझा क्रमण ७ असल्याने मला संधी नाही, पण २०२८च्या ऑलिम्पिकसाठी माझी तयारी सुरू आहे. त्यासाठी मला सराव करण्यासाठी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी कॉलेजमध्ये वातानुकूलित हॉल उपलब्ध करून दिला आहे. तेथे मी वडीलांबरोबर प्रॅक्टीस करतेच शिवाय बाहेरचे खेळाडू ही येतात मी ही ट्रेनिंगसाठी चायना, जपानला जाते. जर्मनीला लीग खेळते. चायनामध्ये खेळाचा सगळ्यात चांगला अनुभव मिळतो.

**९. आपल्या देशाकडून सवलती मिळाल्या आहेत काय?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी खेळाला प्राधान्य देत असल्याने त्यांचे सरकार आल्यावर खेळाला जास्त फंड मिळू लागला. त्यापूर्वी फंड कमी असल्याने मला विराट कोहळी फाऊंडेशनने मदत केली. आता खेलो इंडिया युथ गेम उपक्रम राबविला जात आहे. भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ युथ अफेअर स्पोर्ट्सच्या वतीने टार्गेट ऑफ ऑलिम्पिक पोडियम अंतर्गत डेव्हलोपमेंट स्कीम आणि कोड ग्रुप स्कीमसाठी माझी निवड झाल्याने महिना २५ हजार रूपये शिष्यवृत्ती मिळते. याशिवाय इतर देशात सरावासाठी पाठवले जाते. सरकारकडून खेळाला पाठबळ मिळाल्यानेच यावेळी पाहिल्यांदाच टेबल टेनिसमध्ये पुरुष आणि महिला संघ ऑलिम्पिक २०२४ साठी पात्र ठरला आहे. इतके वर्ष फक्त सिंगलसाठी एखादा खेळाडू पात्र ठरत असे. त्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद देते.

**१०. ऑलिम्पिक २०२८साठी काय तयारी सुरू आहे?**

सराव, फिटनेस, डाएटकडे विशेष लक्ष देत आहे. मेंटल फिटनेसही महत्त्वाचा आहे. त्यासाठी ट्रेनिंग सुरू आहे. सकाळी लवकर उठून फिटनेस साथी व्यायाम नंतर नाष्टा मग सकाळचा सराव त्यानंतर संध्याकाळी पुन्हा सराव. याशिवाय ओलांपिक पात्रतेसाठी जागतिक क्रमवारी महत्त्वाची असल्याने ट्रेनिंगसाठी चायना व जपानला जाणार आहे. त्यानंतर नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये खेळणार आहे.

**(शब्दांकन : नितीन देशमुख)**



## स्वस्तीकाला मिळालेली पदके

* इंटरनॅशनल टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२३ तसेच इंडोशियन क्लब लीग सेशन या दोन्ही स्पर्धांमध्ये महिला एकेरी खुल्या गटात रौप्यपदक
* इंटर स्टेट सिनिअर चॅम्पियनशिप स्पर्धेतील दुहेरी गटात रौप्यपदक खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत टेबल टेनिसमध्ये मुलींच्या दुहेरीत महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष आणि दिया चितळे या जोडीने सुवर्णपदक पटकाविले.
* दक्षिण आशियाई फेडरेशन गेम्स टेबल टेनिस स्पर्धेत सांघिक सुर्वण पदक तर राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत रजत पदक
* दक्षिण आशियाई फेडरेशन चॅम्पियन स्पर्धेत सांघिक गटात भारतीय संघाची कर्णधार म्हणून सांघिक सुवर्णपदक
* ८३ व्या राष्ट्रीय टेबल टेनिस चॅम्पियनशिप स्पर्धेत रजत पटकाविले.
* ८२ व्या ज्युनिअर अँड युथ नॅशनल टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२० राष्ट्रीय स्पर्धेत विजेतेपद
* महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेत १२ वर्षांखालील मुलींच्या गटात रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनला पहिले रौप्यपदक व एकेरीतही स्वतःला रौप्यपदक
* ८२व्या ज्युनिअर ॲण्ड युथ नॅशनल टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२० राष्ट्रीय स्पर्धेत अंडर १८ मुलींच्या गटात विजेतेपद
* टेबल टेनिस खेळाच्या जागतिक क्रमवारीत १९ वर्षीय मुलींच्या गटात चौथ्या स्थानी झेप घेणारी भारतातील पहिली टेबल टेनिस खेळाडू.

## निवडक

### रसायनीत विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप

**मोहोपाडा** : रसायनी येथील बिंग गुढ फाउंडेशन या संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष वैजयंती तुषार ठाकूर यांच्या वतीने रसायनी परिसरातील तूराडे राजिप शाळा, तुंगारतन विद्यामंदिर गुळसुंदे, शिवनगर राजिप शाळा आणि परिसरातील शाळांत दफ्तरांचे वाटप करण्यात आले. गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणात हातभार लागावा या हेतूने वैजयंती तुषार ठाकूर यांच्या वतीने दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांना दप्तर व वह्यांचे वाटप करण्यात येते. यातच शिवनगर शाळेत आदीवासी बांधवांची मुले शिकत असल्याने त्यांना वह्या व दप्तराचे वाटप करण्यात आले. या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सखाराम पाटील, सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप माळी, मयूर ठाकूर, निता मालुसरे आदींसह शाळेय मुख्याध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्याभवनमध्ये विद्यार्थी शपथविधी



**नवी मुंबई :** पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील माध्यमिक मराठी विभागातील विद्यार्थी संसदेचा शपथविधी समारंभ मुख्याध्यापक गोरख कदम यांच्या उपस्थितीत झाला. माजी विद्यार्थी संकेत वैद्य यांच्या विद्यार्थी विकास संकल्पनेतून शाळेत पृथ्वी, अग्नी, जल आणि आकाश या चार गटात विद्यार्थी विभागले गेले. यातील प्रत्येक गट सतकृत्य व सदाचरण करून आपल्या गटाचे गुण अधिकाधिक वाढवण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक गटात गटप्रमुख, उपगटप्रमुख, क्रीडा, अभ्यास, शिस्त, सांस्कृतिक अशा पदांसाठी शाळेत ऑनलाईन निवडणूक घेण्यात आली. सर्व गटांसाठी एक हेडबॉय व एक हेड गर्ल निवडण्यात आला. निवडुन आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली.

# महिलांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी प्राधान्य -नाहटा

**नवी मुंबई : बातमीदार**

विजय नाहता फाऊंडेशनच्या माध्यमातून नवी मुंबईत विविध सामाजिक, सांसस्कृतीक उपक्रम अविरतपणे राबवण्यात येत आहेत. फाऊंडेशनच्या महिला मंचच्या आज हजारो क्रियाशील सदस्य आहेत. महिलांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी आर्थिक विकासासाठी मंच यापुढे प्राधान्य देईल, अशी ग्वाही शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी भव्य महिला मेळाव्यात बोलताना दिली.



वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात विजय नाहटा फाउंडेशन आणि महिला विकास मंचतर्फे नवी मुंबईतील विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी ह.भ.प. वनिता पाटील यांच्या शुश्राव्य व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी समाज प्रबोधन, शिक्षण, सदाचार, आरोग्य, योगा आदी विषयावर महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या मेळाव्यात महिला विकास मंचच्या हजारो सदस्यांना नवी मुंबईतील एमजीएम, सुरज, तेरणा, फोर्टीज अशा विविध नामांकित हॉस्पिटलमध्ये सवलतीच्या दरात आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. महिलांसाठी आरोग्याच्या दृष्टीने विविध सवलती आणि योजनांची सुरुवातदेखील फाउंडेशनच्या वतीने करण्यात आल्याचे अध्यक्षा गार्गी नाहटा, कार्याध्यक्ष शुभांगी सूर्यराव यांनी सांगितले. या मेळाव्यात उपस्थित महिलांचा सत्कार करण्यात आला.

# बेलापूर येथे नवीन पावसाळी जलउदंचन केंद्राचे भूमिपूजन

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

बेलापूर विभागातील सेक्टर १२ येथे असलेले सिडको निर्मित पावसाळी जलउदंचन केंद्र ४० वर्षे जुने आहे. त्याच अनुषंगाने आमदार मंदा म्हात्रे यांच्या अथक प्रयत्नाने रू. ३४ कोटी उपलब्ध करून जुने जलउदंचन केंद्र निष्कासीत करून या ठिकाणी नवीन जलउदंचन केंद्र (पंप हाऊस) बांधण्यात येणार आहे. याचे भूमीपूजन मनपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक सर्वश्री अशोक गुरखे, दिपक पवार, दि. ना. पाटील, भरत जाधव, माजी भाजप जिल्हाध्यक्ष सी. व्ही.रेड्डी, भाजप उपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, ज्येष्ठ समाजसेवक पांडुरंग पाटील, अतिरिक्त आयुक्त शिरीष आरदवाड, उप.आयुक्त पोट्रे, बेलापूर विभागीय अधिकारी शशिकांत तांडेल, कार्यकारी अभियंता संजय पाटील, उपभियंता अजय पाटील तसेच असंख्य नागरिक उपस्थित होते.



# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्साह

**नवी मुंबई : बातमीदार**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील महिला उत्साही प्रतिसाद देत असल्याचे दिसत असून महापालिकेच्या वतीने समुह संघटक, आशा वर्कर मोठया प्रमाणात महिलांची भेट घेऊन त्यांना या योजनेची माहिती देत आहेत तसेच त्यांचे अर्जही भरून घेतले जात आहेत. महिला व बालविकास विभागाच्या नारीशक्ती दूत ॲपद्वारे प्राधान्याने ऑनलाईन अर्ज दाखल करून घेतले जात असून ऑफलाईन अर्जही लेखी भरून घेतले जात आहेत.

नमुंमपा क्षेत्रातील एकही पात्र महिला लाभ घेण्यापासून वंचित राहू नये याची काळजी घेऊन गतिमान कार्यवाही करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले असून त्यानुसार जास्तीत जास्त महिलांपर्यंत योजनेची माहिती पोहचवून त्यांचे अर्ज भरुन घेतले जात आहेत.

याकामी महिला बचत गटांचीही मदत घेतली जात असून समाज विकास विभागाचे समुह संघटक महिला बचत गटांपर्यंत पोहचून त्यातील पात्र महिलांचे अर्ज भरुन घेत आहेत तसेच त्या महिलांमार्फतही इतर महिलांपर्यंत पोहचून योजनेच्या माहितीचे प्रसारण केले जात आहे. योजनेचे अर्ज भरण्यात महिलांना कोणतीही अडचण येऊ नये यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय तसेच ८ विभाग कार्यालय क्षेत्रातील १११ प्रभागांमध्ये 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजना मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून तेथे महिलांचा उत्साही प्रतिसाद मिळताना दिसत आहे. त्यासोबतच शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने चालविण्यात येणा–या २२६ अंगणवाड्यांमध्येही तेथील अंगणवाडी सेविकांकडून अर्ज भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

योजनेविषयी कोणत्याही प्रकारच्या अधिक माहितीसाठी अथवा अडचण आल्यास निराकरणासाठी नवी मुंबई महापालिकेने ९९६९००८०८८ / ९७०२३०९०५४ / ९३७२१०६९७६ हे मोबाईल क्रमांक जाहीर केले आहेत.

# रानभाजी कंटुलीला उरणमधील बाजारपेठेत मागणी

**उरण : वार्ताहर**

गेल्या काही दिवसात कोकणात संततधारेमुळे रानावनात तयार होणाऱ्या रानभाज्या मोठ्या प्रमाणात बाजारामध्ये विक्रीसाठी येत आहेत. या रानभाज्यांना ग्राहकांची पसंती असून मागणीसुद्धा चांगली आहे. पावसाळी रानभाजी कंटुलीला महिलांची पसंती असून ती २०० रुपये किलो दराने मिळत आहे.



उरण तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात कंटुलीची भाजी विक्रीसाठी बाजारपेठेतून येत असून यावर्षी एका किलोला दोनशे रुपये एवढा भाव मिळत आहे. आयुर्वेदानुसार आरोग्यासाठी उत्तम असलेली कंटुलीची भाजी सुरुवातीच्या पावसात मिळत असल्याने या भाजीची मागणी मोठ्या प्रमाणात आहे.

उरण बाजारात राज पालनाका, गांधी चौक, आनंद नगर, आदी ठिकाणी विकावयास आली आहे.

> **पावसाळ्यातील रानभाज्या खाण्यासाठी अत्यंत चविष्ट व रुचकर असतात. करटोलीची भाजी तर आरोग्यासाठी अत्यत गुणकारी अशी आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला काही दिवसच ही भाजी मिळत असल्याने आवर्जुन आम्हीही भाजी खरेदी करतो.**
> **–रजनी मानापुरे, पाल्याची वाडी, केगाव, उरण**

# नवी मुंबई डाक विभाग रिक्तपदे भरणार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय डाक विभागाने ग्रामीण डाक सेवक पदासाठी अधीक्षक डाकघर, नवी मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातील ५१ रिक्त पदे भरली जाणार असे वरिष्ठ अधीक्षक डाकघर,नवीमुंबई विभाग वाशी यांनी केली आहे.

पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. आपले अर्ज अधिक माहितीसाठी नियम व अटी पुढील संकेतस्थळावर ऑनलाईन https://indiapostgdsonline.gov.in अर्ज भरण्याची शेवटची ५ ऑगस्ट २०२४ पर्यंत व त्यापूर्वी ऑनलाईन करावेत. उमेदवारांचे इतर कोणत्याही मांध्यमाद्वारे आलेले अर्ज व व्यक्तिश (हस्तेपोच) आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या सूचनेनुसार शुल्क फी भरावे लागेल.

पोस्ट विभाग उमेदवारांना कोणताही फोन कॉल करत नाही. सबंधित प्राधिकरणाद्वारेचे उमेदवारांशी, पत्रव्यवहार जर असेल तर केला जातो. उमेदवारांनी वैयक्तिक माहिती/ नोंदणी क्रमांक/मोबाईल क्रमांक/ईमेल आयडी इतरांसमोर उघड करू नयेत, असे आवाहन वरिष्ठ अधीक्षक डाकघर, नवी मुंबई विभाग वाशी यांनी एका प्रसिध्द पत्रकाद्वारे कळविले आहे.

## निवडक

### माणगावात रंगली शास्त्रीय संगीत मैफिल



**माणगाव** : येथील अक्षरा म्युझिक अकॅडमीतर्फे नुकतीच तीन सांजेत शास्त्रीय संगीताची सुरेल मैफिल रंगली. या मैफिलीचे उद्घाटन हृदयरोग तज्ज्ञ डॉ.बी.जे.शिंदे आणि डॉ.नीलिमा शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अक्षर चव्हाण यांचे गुरुवर्य खोपोलीचे तबला व हार्मोनियम विशारद यशवंत मेस्त्री व एम. एस. निकम स्कूलचे संगीत शिक्षक अलंकार मनोहर पाटील उपस्थित होते. अकॅडमीच्या सर्व कलाकारांनी आपली कला सादर केली. त्यानंतर गुरुवर्य यशवंत मेस्त्री यांनी ताल सेशन घेऊन मार्गदर्शन केले. सहा तास चाललेल्या या मैफिलीचे सूत्रसंचालन सेवानिवृत्त प्राचार्य आशा शिंदे यांनी करून सचिन धोंडगे यांनी सुरेल शब्दांत उपस्थितांचे आभार मानले.

### झोनल कोऑर्डिनेटरपदी डॉ. सचिन चव्हाण



**माणगाव** : जयपूर येथे होणाऱ्या इंटर्नल व्हाईस ऑफ डॉक्टर्स स्पर्धा २०२४ साठी माणगाव येथील सर्जन डॉ. सचिन चव्हाण यांची झोनल कोऑर्डिनेटर पदावर नियुक्ती जयपूर येथील स्पर्धा समितीने केली आहे. डॉ.चव्हाण यांची उपरोक्त स्पर्धेकरीता नियुक्ती झाल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. जयपूर येथे होणारी ही स्पर्धा जागतिक पातळीवर होत असून या स्पर्धेत परदेशातूनही अनेक स्पर्धक सहभागी होत असतात. या स्पर्धेकरिता माणगाव येथील सुप्रसिद्ध सर्जन डॉ. सचिन चव्हाण यांची साऊथ आणि महाराष्ट्राकरीता नियुक्ती करण्यात आली आहे.

### सद्गुरु खरे महाराज गुरुपुजा कार्यक्रम

**पेण** : गुरुपूजन दिवशी काळेश्री येथील अकादेवी मंदिराजवळ सद्गुरू खरे महाराजांच्या शिष्य मंडळी व त्यांच्या भक्तांनी महाराजांच्या समाधीस्थळी गर्दी केली होती. महाराजांच्या मूर्तीस पेणचे पुरोहित कुणाल ठाकूर यांच्या वतीने अभिषेक व गजानन वर्तक यांच्या हस्ते हार घालण्यात आले. उपाध्यक्ष व्ही. बी. सर यांच्या हस्ते देवीची पूजा करण्यात आली. या वेळी पंचक्रोशी भजनी मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम झाला. भजनात बाबूराव म्हात्रे काळेश्री व त्यांचे सरकारी सहभागी झाले होते. बाबूराव म्हात्रे काळेश्री यांनी मृदुंग साथ केली. भजनामध्ये आत्माराम मोकल बेनवले, वामन म्हात्रे कोप्रोली– पेण, तु. रा. म्हात्रे लाखोले, लक्ष्मण म्हात्रे, देविदास म्हात्रे, दत्तात्रेय म्हात्रे दिव, गजानन वर्तक मोठे वढाव हि सर्व भजन मंडळी भजनात दंग झाले होते. शेवटी महाराजांची आरती घेऊन प्रसाद वाटण्यात आला.

### श्री धावीर नामसप्ताहाला प्रारंभ



**रोहे** : रोह्याचे आराध्य ग्रामदैवत श्री धावीर महाराजांच्या नामसप्ताहाला ब्राह्मण मंडळातर्फे गुरुवारी (दि.२५) श्री ओंकारेश्वर मंदिर येथे उत्साहात सुरुवात झाली. श्री धावीर नाम सप्ताहाचे हे १२४वे वर्ष असून सात दिवस देवासमोर झांज सतत सुरू असते. गुरुवारी सकाळी अध्यक्ष अमित आठवले यांनी देवांसमोर श्रीफळ ठेवून या उत्सवाला प्रारंभ केला. या वेळी मंडळाचे सचिव निखिल दाते, सप्ताह प्रमुख नेहा आवळसकर, खजिनदार चैतन्य आठवले, माजी अध्यक्ष हेमंत ओक, मिलिंद जोशी, मंदार भावे, विवेक बापट, उदय ओक, वासुदेव भिडे, गौरी गांगल आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोकण विकासासाठी कटिबद्ध –मुख्यमंत्री

## गणेशोत्सवापूर्वी मुंबई–गोवा महामार्गाचे काम पूर्ण करण्याचे निर्देश

**चौक, माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा रस्त्याचे काम गणपती आगमनापूर्वी त्वरित करावे, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधीत अधिकाऱ्यांना दिले. कोकण विकास समितीच्या माध्यमातून झालेल्या बैठकीत त्यांनी आदेश दिले.



सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे मुंबई–गोवा महामार्ग प्रश्नावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोकण विकास समितीच्या मागणीनुसार तत्काळ बोलाविलेल्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. या बैठकीला मंत्री दिपक केसरकर, आमदार भरत गोगावले, नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडियाचे श्रीवास्तव, नॅशनल हायवे (सा.बां.) चे मुख्य अभियंता संतोष शेलार, अधीक्षक अभियंता तृप्ती नाग, हायवे वाहतुकीचे अप्पर पोलीस महासंचालक सुरेशकुमार मेकला, अपर मुख्य सचिव म्हैसकर, प्रधान सचिव इक्बाल सिंग चहल, सेवानिवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत, कोकण विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष जयवंत शंकरराव दरेकर, सेवानिवृत्त सुभेदार तसेच कोकण विकास समितीचे सक्रिय सदस्य सुभाष विठोबा दरेकर आणि संबंधित विभागाचे उच्च अधिकारी हजर होते, तर रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व जिल्हाधिकारी किशन जावळे हे ऑनलाईन उपस्थित होते.

या बैठकीत पळस्पे ते इंदापूर रस्त्याच्या दिरांगाईबाबत सुप्रिमो कंपनी ही ठेकेदार असून त्यांना केवळ टर्मिनेट करून चालणार नसून त्यांच्यावर गुन्हा नोंद करून ब्लॅक लिस्टमध्ये नाव घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडियाचे श्रीवास्तव यांना रस्त्याची गुणवत्ता राखणे आणि रस्त्याच्या कडेला मोकळ्या जागेत झाडे लावण्याबाबत सूचना देण्यात आल्या. वळणावर रस्त्याचे रुंदीकरण जास्त करून वड, पिंपळ, उंबरसारखी मोठी झाडे लावण्याबाबत अप्पर मुख्य सचिव म्हैसकर यांना सुचित करून आदेश होण्याची सूचना करण्यात आली.

माणगाव बायपास रस्त्याचे काम करणारी चेतक कंपनीला टर्मिनेट केलेबाबत महामार्गाचे मुख्य अभियंता संतोष शेलार यांनी मुख्यमंत्री यांना सांगितले. आमदार भरत गोगावले यांनी बायपास तत्काळ व्हावा, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली असता पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांचेसोबत ऑनलाईन चर्चा करून सूचना केल्या. त्यासाठी पोलीस व संबंधित यांची मदत घ्यावी, असे आवाहन केले. त्यामुळे वाहतूक कोंडी होणार नाही. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि अभियंता यांनी या मार्गाची संयुक्त पाहणी करून गणपती काळात या मार्गावर वैद्यकीय सुविधा, चहा पाणी नाश्ता यांचे स्टॉल, प्रसाधनगृह, गॅरेज यांची व्यवस्था करण्यात यावी त्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिसाद दिला.

कोकण विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष जयवंत दरेकर यांनी मेगा हायवे बनवीत असताना हायवेवरील जंक्शन खठउ नोर्मप्रमाणे बनविले जावेत, तसेच हायवेवर सर्व्हिस रोड बनविले जात नाहीत त्यासाठी योग्य मार्ग काढावा याही मागणीस राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी यांना त्याची पूर्तता करण्यासाठी आदेश दिले.

मुंबई–गोवा हायवे प्रश्नांवर पूर्तता करण्यासाठी अंतिम मुदत देवून १० ऑगस्ट रोजी हायवेवरून मी स्वतः पाहणी दौरा करणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

## खोपोली रेल्वे स्थानक परिसरात समस्यांचा डोंगर

**खोपोली : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेवरील शेवटचे स्टेशन म्हणून खोपोली रेल्वे स्थानक आहे. या स्थानकावर व परिसरात अनेक समस्या असून या समस्या सोडवण्यासाठी अधिकाऱ्यांनी या स्थानकाला भेट द्यावी अशी मागणी प्रवासी संघाकडून करण्यात आली आहे.



खोपोली हे झपाट्याने विकसित होणारे शहर असून या ठिकाणी असणाऱ्या कारखान्यांसाठी मुंबई व इतर भागातून कामगार व अधिकारी त्याचप्रमाणे येथील बँका व शासकीय कार्यालयात मोठ्या प्रमाणात अधिकारी, कर्मचारी दररोज येत असतात. रेल्वेस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य आहे व साचलेल्या पाण्यातून प्रवाशांना मार्ग काढावा लागतो. मोकळ्या जागेत परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात कचरा टाकल्याने या ठिकाणी कचऱ्याची दुर्गंधी येत असल्याची प्रवाशांकडून तक्रारी करण्यात येत आहे. अनेकदा रेल्वे स्थानकात भटके कुत्रे व भिकाऱ्यांचा सुळसुळाट असतो.

पोलीस अथवा होमगार्ड असतील त्या दिवशी भिकारी व गर्दुले गायब होतात. मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी खोपोलीला भेट देऊन प्रवाशांच्या मागण्यांबाबत विचार करावा व न्याय द्यावा, अशी मागणी खोपोली प्रवासी संघटनेचे अध्यक्ष पांडुरंग दळवी यांनी केली आहे.

**खोपोली रेल्वेस्टेशनबाबत आम्ही लवकरच खासदार श्रीरंग बारणे यांची भेट घेऊन त्याबाबतचे निवेदन देणार आहोत.**

**–अश्विनी अत्रे, महिला आघाडी खोपोली शहर प्रमुख, भाजप**

## ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचा राजिपवर धडक मोर्चा

**नागोठणे : बातमीदार**

आपल्या प्रलंबित मागाण्यांसाठी रायगड जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटना ९ ऑगस्ट रोजी धडक मोर्चा काढणार असल्याची माहिती ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मंगेश म्हात्रे, उपाध्यक्ष गोविंद म्हात्रे, सुहासिनी माधव मोकाशी व सचिव रमेश तांडेल यांनी दिली आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय निश्चित करावे, सन २०२२नंतर सेवाज्येष्ठता यादी प्रसिद्ध करावी, किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी व राहणीमान भत्ता न देणाऱ्या ग्रामपंचायतीवर कारवाई करावी, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या अपिलाची सुनावणी ६ ते ८ महिने प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, संघटनेला विश्वासात घेऊन १० टक्के भरती करावी, कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर लाभ न देणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, यांसह अनेक विविध मागाण्या करण्यात आल्या आहेत.

## कर्जतमध्ये राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील वाकस ग्रामपंचायत तसेच ओलमन ग्रामपंचायत आणि चिंचवली ग्रामपंचायतीमधील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. माजी सरपंच संजय तांबोळी यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला धक्का दिला.

आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत वाकस राष्ट्रवादीचे संजय तांबोळी, युवक जिल्हा सरचिटणीस जयवंत शिनारे, वाकस माजी उपसरपंच अशोक पेमारे, तंटामुक्ती अध्यक्ष कैलास शिनारे, कळंब पं. स. विभागप्रमुख अमोल देशमुख, धोत्रे येथील अशोक रसाळ, चिंचवली ग्रामपंचायत तंटामुक्त समितीचे अध्यक्ष भरत कांबरी यांच्यासह कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. उत्तर रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर, विधानसभा संघटक शिवराम बदे, तालुका संपर्कप्रमुख दिलीप ताम्हाणे, तालुका समन्वयक रमेश मते, तालुका उपसंघटक संतोष कोळंबे, प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



## शासनाने नुकसानग्रस्तांना भरपाई द्यावी– प्रसाद भोईर

**पाली : प्रतिनिधी**

पाली सुधागडमध्ये पावसाने थैमान घातले होते. सर्वत्र पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून अनेक घरे आणि दुकानात पुराचे पाणी शिरून हाहाकार उडाला. या भागाची पेण सुधागड रोहा भाजप विधानसभा क्षेत्र अध्यक्ष प्रसाद भोईर यांनी पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला. या पुरामुळे नुकसान झालेल्या नागरिकांना शासनाने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



नागोठणे कोळीवाडा येथील घरात पुराचे पाणी शिरून जनजीवन विस्कळीत झाले. नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविणे तसेच आवश्यक ते सहकार्य देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. त्यांनी पूरग्रस्त भागात जाऊन व्यापारी, दुकानदार, तसेच नागरिकांशी संवाद साधला. झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे होऊन नुकसानग्रस्त नागरिक, दुकानदारांना शासनाने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी प्रसाद भोईर यांनी केली.

## चणेरे शाळेत विविध उपक्रम; भाजप उपाध्यक्ष दिलीप भोईर यांची उपस्थिती

**मुरुड : प्रतिनिधी**

चणेरे येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शाळेत बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या अनावरण भाजप दक्षिण रायगडचे उपाध्यक्ष दिलीप भोईर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विविध उपक्रमही राबविण्यात आले.

शाळेचे माजी विद्यार्थी भूषण साळवी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शाळेला सीसीटीव्ही कॅमेऱ्याची गरज असल्याचे उपाध्यक्ष दिलीप भोईर यांना सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांनी स्वखर्चाने ही सुविधा उपलब्ध करून दिली. या वेळी दहावी आणि बारावीमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता, तसेच शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमासाठी भाजप कार्यकारिणी सदस्य अमित म्हात्रे, मुरुड तालुका उपाध्यक्ष स्वप्निल चव्हाण, माजी अध्यक्ष महेंद्र चौलकर, कार्यकर्ते भारत खाडे, संतोष ठाकूर, सुहास भगत, परशुराम तांबडे, भूषण साळवी, राकेश औचटकर, मियाँ बडे, भाजपा सरचिटणीस सुदाम वाघीलकर, शिवसेना सरचिटणीस मनोज भायतांडेल, सुरेंद्र गिरणेकर, आदिनाथ सानेकर, ज्ञानेश्वर डोलकर, खांबेरेचे सरपंच अतिश मोरे, अलिबाग तालुका युवा मोर्चा सरचिटणीस प्रथमेश मांजरेकर, चणेरेचे माजी सरपंच तुळशीराम पवार, वळकेचे सदस्य जयवंत चवरकर, काशिनाथ म्हात्रे, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.



## खोपोलीच्या बाजारात रानभाज्या दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळा आला की, खेड्यापाड्यातच नव्हे तर शहरातही रोजच्या जेवणात रानभाज्यांची रेलचेल असते. गरीब कुटुंबे पावसाळाभर या रानभाज्यावरच बहुधा अवलंबून असत. या रानभाज्या खोपोलीच्या बाजारात दाखल झाल्या आहेत.



ग्रामीण भागात वाढत्या बांधकामामुळे या रानभाज्या सध्या दुर्मिळ झाल्याचे चित्र असून आहेत. दरवर्षी पावसाचे आगमन होताच जंगलात अनेक प्रकारच्या रानभाज्या निर्माण होत असतात. या रानभाज्यांमुळे आदिवासी बांधवांना काही प्रमाणात रोजगारही मिळत असतो. शिवाय निसर्गाच्या मुळाशी अनेक प्रकारच्या रानभाज्या सहज निर्माण होत असल्याने या रानाभाज्यांचे महत्त्व दैनंदिन जीवनात अजूनही घटले नाही. यामुळे बाजरात तसेच रहदारीच्या ठिकाणी रानभाज्या दिसू लागल्या आहेत.

प्रामुख्याने यामध्ये कंटुली, आंबट बिंदुकली, कोळी, रानतेरी, लोथ, करडू, बोकर, कवळा, टाकला, भारंगी या भाज्या आरोग्यदायी असल्यामुळे या भाज्यांना आयुर्वेदातही महत्त्व आहे. यामुळे या रानभाज्या ग्रामीण तसेच शहरी भागात आवडीने खाल्ल्या जातात.

रानभाज्या विकून घरचे भागवणे सोपे जाते तसेच दिवसाला २००–३०० रुपये मिळत असल्याने घरातील खर्च भागविले जाते, तसेच या रानभाज्या रुचकर आणि चवदार असल्याने अनेक जण खरेदी करीत असतात, असे रानभाज्या विक्रेत्या महिलांनी सांगितले.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. गुरुवारी (दि.२५) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १३१ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख २६ हजार रुपये इतका दंड आकारला आहे.

## 'जेएसएस'चा कौशल्य दीक्षांत सोहळा उत्साहात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जनशिक्षण संस्थान (जेएसएस) यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या कौशल्य विकास उपक्रमाचा दीक्षांत समारंभ शुक्रवारी (दि.२६) सहाण येथे उत्साहात पार पडला.



समाजातील तळागाळातील निरक्षर, अपूर्ण खंडित शिक्षण झालेल्या व जेएसएसच्या माध्यमातून कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला, तसेच प्रशिक्षक गणेश भोपी व संपादक मिलिंद खारपाटील यांचादेखील जनशिक्षण सेवा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्षा रत्नप्रभा बेल्हेकर, प्रमुख पाहुणे महाराष्ट्र स्टेट स्किल युनिव्हर्सिटी सहाय्यक प्रोफेसर डॉ. जयंत काठे, ए४ डेव्हलपमेंट अँड कोचिंग लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर आर. के. लवांदे, कन्सल्टंट राज नाईक, सामाजिक कार्यकर्त्या काश्मिरा भट, उद्योजिका वर्षा भट, बोर्ड मेंबर नरेन जाधव, चंद्रशेखर पाटील, संचालक डॉ. विजय कोकणे, अकाउंट मॅनेजर प्रतीक्षा चव्हाण, कल्पना म्हात्रे, रश्मी पाटील व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी राजश्री पाटील उपस्थित होते.

# भारताची आशिया चषकाच्या अंतिम फेरीत धडक

## स्मृती मानधनाचे शानदार अर्धशतक



**दाम्बुला : वृत्तसंस्था**

महिला आशिया चषकाच्या पहिल्या उपांत्य सामन्यात भारतीय संघाने बांगलादेशचा दारूण पराभव केला. यासह हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वातील टीम इंडियाने अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. बांगलादेशने दिलेल्या सोप्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय सलामीवीर शेफाली वर्मा आणि स्मृती मानधना यांनी स्फोटक खेळी केली. स्मृती मानधना (नाबाद ५५ धावा) आणि शेफाली वर्मा (नाबाद २६ धावा) यांच्या खेळीच्या जोरावर टीम इंडियाने अंतिम फेरीत प्रवेश केला. भारताने १० विकेट आणि ५४ राखून सामना जिंकला. त्यामुळे यंदाचाही आशिया चषक जिंकून भारतीय संघ आठव्यांदा किताब जिंकण्याची किमया साधतो का हे पाहण्याजोगे असेल. रणगीरी दाम्बुला आंतरराष्ट्रीय मैदानात भारत आणि बांगलादेश यांच्यात लढत झाली.

तत्पूर्वी, बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय गोलंदाजांनी सांघिक कामगिरी करीत बांगलादेशला अवघ्या ८० धावांत रोखले. रेणुका सिंग आणि राधिका यादव यांनी प्रत्येकी ३-३ बळी घेतले, तर पूजा वस्त्राकर आणि दीप्ती शर्मा यांना प्रत्येकी १-१ बळी घेण्यात यश आले. बांगलादेशकडून कर्णधार निगर सुल्ताना (५१ चेंडूत ३२ धावा) वगळता एकाही फलंदाजाला खेळपट्टीवर टिकता आले नाही. भारताकडून रेणुका सिंगने गोलंदाजीत कमाल केली. तिने ४ षटकांत अवघ्या १० धावा देत महत्त्वाचे तीन बळी घेतले. अखेर बांगलादेशचा संघ निर्धारित २० षटकांत ८ बाद केवळ ८० धावा करू शकला. या सोप्या आव्हानाचा सहज पाठलाग करून भारतीय संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला. यजमान श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्यातील विजयी संघ भारतासोबत किताबासाठी मैदानात असेल. २८ तारखेला रविवारी या स्पर्धेचा अंतिम सामना खेळवला जाईल.

श्रीलंकेच्या धरतीवर महिलांच्या आशिया चषकाचा थरार रंगला आहे. एकूण आठ संघ एका ट्रॉफीसाठी मैदानात होते, पण आता ही स्पर्धा अंतिम टप्प्यात आली असून स्पर्धेचा प्रबळ दावेदार असलेल्या टीम इंडियाने अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे. भारतीय संघाने सर्वाधिक सातवेळा आशिया चषकाचा किताब जिंकला आहे. बांगलादेशने एकदा विजय मिळवला आहे, तर श्रीलंकेने पाच अंतिम सामने खेळूनही त्यांना अद्याप किताब जिंकता आला नाही. आशिया चषकाच्या स्पर्धेनंतर ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात बांगलादेशच्या धरतीवर ट्वेंटी-२० विश्वचषक होणार आहे. त्यामुळे ही स्पर्धा म्हणजे एकप्रकारे विश्वचषकाची तयारीच आहे.

# 'सीकेटी'ची राशी पाटील बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई येथे झालेल्या १७ वर्षांखालील बुद्धिबळ स्पर्धेत मुलींमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमिक विद्यालयाची राशी हर्षल पाटील (इयत्ता सातवी) हिने प्रथम पारितोषिक प्राप्त केले. ही स्पर्धा आयडियल ग्रुप ऑफ स्पोर्ट्स अकॅडमी अँड आरएमएमएस यांच्यातर्फे आयोजित करण्यात आली होती.

विजेत्या विद्यार्थिनीचे विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थिनीचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मार्गदर्शक शिक्षकांनी अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




# पुढील महिन्यात प्रो कबड्डीच्या ११व्या हंगामाचे ऑक्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

मशाल स्पोर्ट्स या प्रमुख आयोजकांना पीकेएलच्या ११व्या मोसमासाठी खेळाडूंच्या लिलाव करण्यात येणार आहे. हा लिलाव मुंबई येथे १५ व १६ ऑगस्ट रोजी पार पडणार आहे.

मुंबई येथे सुरू झालेला प्रो कबड्डी लीगचे १०वे सत्र यशस्वी पार पडले आहे. प्रो कबड्डी लीग स्पर्धा तब्बल १० मोसम पूर्ण करणारी भारतातील केवळ दुसरीच स्पोर्ट्स लीग स्पर्धा ठरलीय. दरम्यान मशाल स्पोर्ट्सच्या वतीने प्रो कबड्डी लीगच्या ११व्या मोसमासाठी नव्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले.




या बोधचिन्हात भारतीय राष्ट्रध्वजाच्या भगव्या आणि हिरव्या रंगाची संगती साधण्यात आली आहे. त्यामुळे कबड्डी हा भारताचा प्रमुख असल्याचे अधोरेखित झाल्याचे प्रो कबड्डी लीगचे कमिशनर अनुपम गोस्वामी म्हणाले.

प्रो कबड्डी लीगच्या ११व्या मोसमासाठी खेळाडूंचा लिलाव स्वातंत्र्यदिनी आयोजित करण्यात आले. अतिशय अभिमान वाटत आहे. गेल्या अनेक शतकांपासून भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य दाखवणारा वैशिष्ट्यपूर्ण खेळ असलेल्या कबड्डीचे जागतिक स्तरावर स्पर्धात्मक खेळ म्हणून प्रो कबड्डी लीगच्या माध्यमातून प्रदर्शन करण्यात आल्याची माहिती गोस्वामी यांनी दिली.

प्रो कबड्डी लीग स्पर्धेतील सर्व गुंतवणूकदार, प्रायोजक आणि अखिल भारतीय कबड्डी महासंघांशी संलग्न असलेले सर्व घटक यांच्यासाठी ही अभिमानाची बाब आहे. ११व्या मोसमासाठी खेळाडूंचा लिलाव करताना एक खास कार्यक्रम सादर करून आम्ही गाठलेला हा टप्पा साजरा करण्याचा आमचा मनोदय असल्याचे गोस्वामी म्हणाले.

# मुंबईत ज्युनियर राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेचे आयोजन

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र कॅरम असोसिशनच्या वतीने व सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूट दादर यांच्या सहयोगाने ५८व्या ज्युनियर राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूट, दादर, मुंबई येथे ६ ऑगस्ट रोजी स्पर्धा होणार आहे. १८ वर्षखालील मुले व मुली आणि २१ वर्षखालील मुले व मुली अशा एकंदर चार गटांमध्ये ही स्पर्धा रंगणार आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या www.maharashtracarromassociation.com या वेबसाईटवर उपलब्ध असून महाराष्ट्र कॅरम असोसिएशनला संलग्न असलेल्या जिल्हा संघटनांनी आपल्या संघाच्या प्रवेशिका १ ऑगस्टपर्यंत महाराष्ट्र कॅरम असोसिएशनकडे नोंदवाव्यात, असे आवाहन महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे मानद सचिव अरुण केदार यांनी केले आहे.

# महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या पूर्वचाचणी पंच परीक्षेत रायगडची सरशी

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने नुकतीच पुणे येथे क्रिकेट पंचांची पूर्वचाचणी परीक्षा घेण्यात आली होती. एमसीएच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या सर्व जिल्ह्यातील एकूण ४८३ उमेदवारांनी परीक्षेसाठी अर्ज केले होते. प्रत्यक्ष परीक्षेला ३८१ उमेदवारांनी हजेरी लावली. त्यामध्ये केवळ ६८ उमेदवार ८०पेक्षा जास्त गुण प्राप्त करून उतीर्ण झाले आहेत. रायगड जिल्ह्यातील एकूण १४ जणांनी ही परीक्षा उत्तीर्ण करून सरशी मिळवली आहे. एमसीएच्या मुख्य स्टेट पॅनल पंच परीक्षेसाठी आता हे उमेदवार पात्र ठरले आहेत

अलिबाग तालुक्यातून संकेश ढोले, पुरुषोत्तम भगत, अभिजित वाडकर, पेण सागर मुळे, उरणमधून प्रशांत माळी, वरुण म्हात्रे, संदेश बळीराम म्हात्रे, रोहन पाटील, संदेशकुमार म्हात्रे, पनवेल विघ्नहर्ता मुंढे, अरमान शेख, राजेश शिंदे, रसायनी निशांत माळी तर खालापूर तालुक्यातून प्रवीण देशमुख असे १४ पंच उत्तीर्ण झाले आहेत.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनने पंच परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी बीसीसीआयचे पंच रोहन इंगवले यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवस कार्यशाळा वर्गाचे आयोजन केले गेले, तसेच उरणचे क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ व प्रशिक्षक नयन कट्टा यांनी पुढाकार घेऊन बीसीसीआयचे पंच हर्षद रावले व मुंबई क्रिकेट असोसिएशनचे पंच राजन कसबे यांच्या सहकार्याने सतत आठ दिवस ऑनलाईन पद्धतीद्वारे परिक्षेस बसलेल्या पंचाना उत्तम प्रशिक्षण देऊन परीक्षेची तयारी करून घेतली.

ऑगस्ट महिन्यात एमसीएमार्फत उत्तीर्ण झालेल्या सर्व पंचांना मुख्य परिक्षेपूर्वी दोन दिवसीय कार्यशाळा शिबिराचे वर्ग व ऑनलाईन मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. एमसीए आयोजित पंचांच्या पूर्वतयारी परीक्षेत रायगड जिल्ह्याच्या मुलांनी सरशी मिळवल्या बद्दल आरडीसीएचे अध्यक्ष अनिरूद्ध पाटील, सचिव प्रदिप नाईक यांनी सर्व उत्तीर्ण झालेल्या तचेच परीक्षेसाठी बसलेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन केले.

# पाकिस्तानमध्ये टीम इंडियाला धोका -हरभजन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आताच्या घडीला क्रिकेट वर्तुळात सर्वांत चर्चेत असलेला मुद्दा म्हणजे चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५. पाकिस्तानात होणाऱ्या या स्पर्धेवरून भारत आणि पाकिस्तान असा वाद रंगत आहे. पाकिस्तानचे माजी खेळाडू भारतीय संघाला पाकिस्तानात आणण्यासाठी भावनिक साद घालत आहेत. अशातच भारताचा माजी खेळाडू हरभजन सिंगने संतप्त प्रतिक्रिया दिली.



टीम इंडिया पाकिस्तानात जाणार नाही असे हरभजनने स्पष्ट केले.

हरभजन सिंगने सांगितले की, भारतीय संघाने पाकिस्तानात का जावे? याचे उत्तर कोणीही द्यावे कारण की तिथे सुरक्षेचा मुद्दा आहे. तिथे त्यांचेच लोक सुरक्षित नाहीत. टीम इंडियाला पाकिस्तानात खूप धोका आहे. तिकडे दररोज काही ना काही दुर्दैवी घटना घडत आहेत. त्यामुळे मला नाही वाटत की, तिकडे जाणे योग्य आहे. बीसीसीआयने योग्य निर्णय घेतला असून, टीम इंडिया पाकिस्तानात जाणार नाही हे निश्चित आहे.

दरम्यान, पाकिस्तानात होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीवरून बीसीसीआय आणि पीसीबी यांच्यात पुन्हा एकदा संघर्ष होत असल्याचे दिसते. आयसीसीच्या नियोजित वेळापत्रकानुसार पाकिस्तानच्या धरतीवर चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५चा थरार रंगणार आहे, पण बीसीसीआय आपल्या संघाला पाकिस्तानात पाठवणार नसल्याचे कळते.

# रणजी ट्रॉफीसाठी ऋतुराज गायकवाड महाराष्ट्राचा कर्णधार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा मराठमोळा खेळाडू ऋतुराज गायकवाड सध्या शानदार फॉर्ममध्ये आहे. रणजी ट्रॉफी २०२४-२५साठी ऋतुराजला महाराष्ट्राच्या संघाचा कर्णधार बनवण्यात आले आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने संघ जाहीर केला असून, अर्शीन कुलकर्णी आणि राहुल त्रिपाठी यांचाही त्यात समावेश आहे.

शुबमन गिलच्या नेतृत्वातील भारतीय संघाने अलीकडेच झिम्बॉब्वे दौरा केला. हरारे येथे झिम्बॉब्वेविरुद्ध गायकवाडने चमकदार कामगिरी केली होती. त्याने एका सामन्यात नाबाद ७७ धावा केल्या होत्या. याशिवाय एका सामन्यात ४९ धावांची खेळी करण्यात त्याला यश आले. ऋतुराज गायकवाडने भारताकडून २३ ट्वेंटी-२० सामने खेळले असून, ६३३ धावा केल्या आहेत, तसेच त्याला सहा वन डे सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com